शनिवार, १३ ऑगस्ट २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २७
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## राज्यातील ६०८ ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर

**१८ सप्टेंबरला मतदान; सरपंचपदाची थेट जनतेतून होणार निवड**

**मुंबई** : राज्यात पावसाचे प्रमाण कमी असलेल्या विविध ५१ तालुक्यांतील ६०८ ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १८ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी संबंधित ठिकाणी तत्काळ आचारसंहिता लागू झाली असून १९ सप्टेंबर रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी शुक्रवारी (दि. १२) येथे केली. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याचा कालावधी २४ ऑगस्ट ते १ सप्टेंबर असा आहे. शासकीय सुटीमुळे २७, २८ व ३१ ऑगस्ट रोजी नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार नाहीत. छाननी २ सप्टेंबर रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर मतदान १८ सप्टेंबरला आणि मतमोजणी १९ सप्टेंबर रोजी होईल.

### अंतरंग

रोह्यात घर कोसळून बालक गंभीर जखमी/२
हर घर तिरंगा अभियानाचा रायगड जिल्ह्यात जागर/५
रेवदंड्यात नारळ फोडी स्पर्धा; धाटावकरांचा संघ विजेता/८

# भाजप प्रदेशाध्यक्षपदी चंद्रशेखर बावनकुळे

## मुंबई अध्यक्षपदाची धुरा आशिष शेलारांकडे



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप नेते आमदार चंद्रशेखर बावनकुळे पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष झाले आहेत. चंद्रकांत पाटील कॅबिनेट मंत्री झाल्यामुळे त्यांच्या जागी बावनकुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर आमदार आशिष शेलार यांच्याकडे भाजपच्या मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. विद्यमान मुंबई अध्यक्ष मंगलप्रभात लोढा यांचीही मंत्रिपदी नियुक्ती झाल्याने महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेलार यांच्याकडे अध्यक्षपद सोपविण्यात आले आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रदेशाध्यक्षपदी, तर मुंबई अध्यक्षपदी आशिष शेलार यांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांच्या सहीने हे पत्र देण्यात आले. बावनकुळे यांच्याकडे फडणवीस सरकारच्या काळात ऊर्जामंत्रिपदाची धुरा होती. डिसेंबर २०१४मध्ये नागपूरचे पालकमंत्री म्हणूनही त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यंदा विधान परिषद निवडणुकीत बावनकुळेंना नागपूरमधून संधी देण्यात आली. या निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला.

नवनियुक्त भाजप मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार हे पेशाने वकील असून त्यांनी यापूर्वी दोन वेळा मुंबईचे अध्यक्षपद यशस्वीपणे सांभाळलेले आहे, तर फडणवीस सरकारच्या काळात त्यांनी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याणमंत्री म्हणून काम पाहिले. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांची नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

> **माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याच्या खांद्यावर मोठी जबाबदारी दिल्याने मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, जेपी नड्डा आणि भाजपच्या संपूर्ण केंद्रीय नेतृत्वाचे तसेच देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानतो. या जबाबदारीतून पुढच्या काळात मला सर्वांना सोबत घेऊन महाराष्ट्रातील नंबर वन पक्ष असलेला भाजप आणखी पुढे कसा नेता येईल तसेच शेवटच्या व्यक्तीपर्यंत कसा पोहचवता येईल याचा प्रयत्न करणार.**
>
> **–चंद्रशेखर बावनकुळे,** भाजप प्रदेशाध्यक्ष

> **मुंबईत शिवसेनेने केलेल्या भ्रष्टाचारापासून आपल्याला नागरिकांना मुक्त करायचे आहे. शिवसेना मुंबईत केलेल्या भ्रष्टाचारापासून पळ काढू शकत नाही. आमच्यासोबत संघर्ष करू शकत नाही. आमचं ठरलंय! मुंबईत बदल अटळ आहे. शिंदे यांची शिवसेना खरी शिवसेना असून ठाकरेंची शिवसेना आता तडीपार होणार आहे. आमचा मुंबई महापालिकेतील निवडणुकीत विजय होणार आहे. शिंदे गट नवे शिवसेना भवन उभारत असल्याचा आनंद आहे.**
>
> **– आशिष शेलार,** मुंबई भाजप अध्यक्ष



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

## गव्हाण कोपर येथील नूतन शाळा इमारतीचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील जिल्हा परिषद शाळेची नवीन इमारत बांधून तयार झाली असून या इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १२) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी इमारत चांगली असली की, शिक्षण घेण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होते, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला उद्योजक जे. एम. म्हात्रे, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जि. प. सदस्य रवींद्र पाटील, पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे, सचिन घरत, सुनिता घरत, कामिनी कोळी, उषा देशमुख, रघुनाथशेठ घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, **(पान २ वर..)**

▪ अटल टिंकरींग लॅबचे उद्घाटन/३

## पनवेलमध्ये येत्या सोमवारी तिरंगा एकता सायकल रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अमृत महोत्सवी (७५व्या) स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल इलिट यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १५) तिरंगा एकता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य दिनी सकाळी ९.३० वाजता तिरंगा रॅली पनवेल तालुका व शहर भाजप मध्यवर्ती कार्यालय येथून सुरू होणार असून ही सायकल रॅली पाच किमी अंतराची आहे. या वेळी देशभक्तीपर गाण्यांचा कार्यक्रमसुद्धा होणार आहे. या रॅलीत सहभागी होणाऱ्या सायकलस्वारास मोफत टी-शर्ट देण्यात येणार आहे.

या रॅलीत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा तसेच अधिक माहिती व सहभागासाठी रोहित जगताप (८६९१९३०७०९), आदित्य जोशी (९०२२०४४०२५) किंवा देवांशू प्रभाळे (८४३३५१३५४०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शिंदे गट दादरमध्ये उभारणार नवे सेनाभवन

### मुंबईतील प्रत्येक प्रभागात असणार कार्यालय



**मुंबई : प्रतिनिधी**

मोठ्या राजकीय घडामोडींनंतर राज्यात सत्तापालट झाला आणि शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाले. त्यानंतर शिंदे गट आणि शिवसेना यांच्यात संघर्ष सुरूच असून उद्धव ठाकरे यांना टक्कर देण्यासाठी आता शिंदे गट नवे सेनाभवन उभारणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाची गती पाहता त्यांना एका चांगल्या कार्यालयाची गरज आहे आणि त्यांचे मुख्य कार्यालय दादर परिसरातच असेल, असे शिंदे समर्थक आमदार सदा सरवणकर यांनी सांगितले. मुंबईतील प्रत्येक प्रभागात या नव्या सेनाभवनाचे कार्यालय असेल. याशिवाय नवीन विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यांच्याही स्वतंत्र शाखा असतील. या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडवू, असेही ते म्हणाले.

## खातेवाटप लवकरच होणार -उपमुख्यमंत्री



**वर्धा** : शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यानंतर दीड महिन्याने मंत्रिमंडळ विस्तार झाला. आता खातेवाटप कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खातेवाटप लवकरच होईल, असे सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लवकरच खातेवाटप होईल. काळजी करू नका. तुम्हाला माहिती मिळेल. तोपर्यंत तुम्हाला बरं आहे, तुम्ही दिवसभरात अनेक वेळेला खातेवाटप करीत आहात. आम्ही पेपर फोडला, तर तुम्हाला काम मिळणार नाही.



(वृत्त पान ३ वर..)

**पनवेल : नारळीपौर्णिमेनिमित्त गुरुवारी कोळीवाडा येथे माजी मनपा सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नारळ अर्पण करण्यात आला. त्यांचे कोळी बांधवांकडून स्वागत करण्यात आले. माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका रूचिता लोंढे आदी सोबत होते.**



# ठाकरे सरकारकडून कामे होत नव्हती

## शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी सांगितले उठावाचे कारण

**पुणे : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांच्या सरकारकडून लोकांची कामे होत नव्हती. त्यामुळे आमदारांना उठाव करावा लागला. उठाव करायलाही मोठे धैर्य लागते. काही जण हे धैये दाखवू शकले नाहीत. त्यांनीही ते दाखविले असते, तर एक दोन वगळता सगळे आमदार या उठावात सहभागी झाले असते अशी प्रतिक्रिया शिंदे गटाचे प्रवक्ते आणि कॅबिनेटमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी (दि. १२) पुण्यात माध्यमांशी बोलताना दिली.



राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार नुकताच झाला. त्यामुळे विरोधकांची तोंडे मंत्रिमंडळ विस्तारावरुन बंद झाली आहेत. मात्र यामध्ये अपक्ष आमदारांना संधी मिळाली नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला ऊत आला. यात बच्चू कडू हेदेखील नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर दीपक केसरकर यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना त्यांनी शिवसेनेतील आमदारांनी केलेल्या उठावाबाबत विधान केले आहे. बच्चू कडू यांच्याबाबत बोलताना केसकर म्हणाले, आमच्याकडे दोन अपक्ष मंत्री होते आणि दोघांपैकी एकालाच घेतले असते तर वेगळा संदेश जाऊ शकला असता. बच्चू कडू हे खरंतर ज्येष्ठ आहेत, ते एका पक्षाचे अध्यक्षदेखील आहेत. त्यांचा योग्य तो मान दुसऱ्या टप्प्यात ठेवला जाणार आहे, तसे आम्हाला मुख्यमंत्र्यांनीदेखील सांगितले आहे. आपले त्यांच्याशी अतिशय चांगले संबंध आहेत. मी देखील त्यांची भेट घेईन. त्यांनी रागवण्यासारखे काहीच कारण नाही. मला स्वत:लाही खात्री नव्हती की, मी सुद्धा येऊ शकेन की नाही मंत्रिमंडळात आणि तशी परिस्थिती होती. आमदार संजय राठोड यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आल्यानंतर यावरून विरोधकांनी टिकेच्या पार्श्वभूमीवर केसरकर यांनी भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, हा आरोप कित्येक महिन्यांपूर्वी केला गेला होता. जवळजवळ याला वर्ष झाले. त्या दरम्यान जी चौकशी झाली, त्यात ते कुठेही दोषी आढळले नाहीत. त्यांच्यावर दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. एखाद्या समाजाचे प्रतिनिधित्व ज्यावेळी ते करतात, त्या वेळी तुम्ही लाखो लोकांचे प्रतिनिधित्व करत असतात आणि अशा शेकडो लोकांनी जेव्हा तत्कालीन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, तेव्हा त्यांनीदेखील आश्वासन दिले होते, की जर दोष त्यांच्यावर नाही आला तर आम्ही पुन्हा त्यांना मंत्रिमंडळात घेऊ. त्यांनी आपले वचन पूर्ण केलेले नसले, तरी हे एक बंजारा समाजाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेले वचन होते. त्याची पूर्तता व्हायला पाहिजे असेही ते म्हणाले. तसेच, याशिवाय मी आपल्याला खात्री देतो की, निपक्षपातीपणे ती चौकशी होईल. परंतु जर ते दोषीच नसतील तर त्यांना मंत्रिमंडळातून दूर ठेवावे, असे का म्हटले जातेय? हादेखील एक भाग आहे. जर ते दोषी आढळले असतील तर निश्चितपणे त्यांना घेतलेच नसते. परंतु हा प्रश्न वारंवार विचारला जातोय. विरोधकांकडे काही मुद्दे शिल्लकच नाहीत. अगोदर म्हणायचे की, आमच्यातील १५-२० लोक परत येणार, परंतु प्रत्यक्षात आम्ही जेव्हा परत झालो तेव्हा त्यांच्यात असलेल्यांपैकी एक कमी झाला. आणखी कितीतरी लोक कमी होणार असेही ते म्हणाले.

# हर घर तिरंगा अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## भाजप राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त होणाऱ्या 'हर घर तिरंगा' या अभियानाला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच असे प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकविण्याचे अभियान होत आहे. राज्यातील सर्व घरांवर शनिवारी (दि. १३) ते सोमवारी (दि. १५) या कालावधीत तिरंगा फडकावून सर्वांनी यामध्ये उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी शुक्रवारी (दि. १२) मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषदेत केले.



या वेळी प्रदेश उपाध्यक्ष राज पुरोहित, आशीष कुलकर्णी, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रवक्ते गणेश हाके, उत्तर भारतीय मोर्चाचे संयोजक डॉ. संजय पांड्ये उपस्थित होते. तावडे पुढे म्हणाले की, १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत देशभरातल्या २० कोटी घरांवर तिरंगा फडकविला जाणार आहे. हा जनतेचा कार्यक्रम आहे. लोक स्वत: पुढाकार घेत तिरंगा यात्रेमध्ये सहभागी होत आहेत. अनेक ठिकाणी लोकांनी आजपासूनच घरावर तिरंगा लावण्यास सुरुवात केली आहे. भाजपाचे कार्यकर्ते सुद्धा हे अभियान यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत. ते म्हणाले की, आम्ही देशातल्या युवकांना सांगू इच्छितो की, हर घर तिरंगा हे तुमचे अभियान आहे. या अभियानासोबत जोडून आपल्या घरी तिरंगा फडकावून www.harghartiranga.com या संकेतस्थळावर फोटो अपलोड करावा. तिरंगा यात्रेमुळे देशाच्या तरूणांमध्ये देशभक्ती जागृत होत असल्याचेही ते म्हणाले.

**अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रम**

अमृत महोत्सवी वर्षासंबंधी जनजागृती करण्यासाठी, देशप्रेमाची भावना वाढीस लागावी यासाठी तिरंगा यात्रा काढणे, ठिकठिकाणी फलक लावणे यासारखे उपक्रम राबविले. देशातल्या प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात व प्रत्येक तालुक्यांमध्ये तिरंगा यात्रेचे आयोजन केले होते. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तसेच विविध कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहितीही भाजप नेते तावडे यांनी दिली.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सेल्फी विथ तिरंगा उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध उपक्रमाने जल्लोषाने सर्वत्र साजरा होत आहे. या निमित्त शासनाच्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत नेहरू युवा केंद्र अलिबाग-रायगड, त्याचप्रमाणे महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे आणि वटवृक्ष सामाजिक संस्था उलवे यांच्या सहआयोजनातून रायगड जिल्ह्यातील सर्व वयोगटातील नागरिकांना सेल्फी विथ तिरंगा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट २०२२ रोजी आपल्या घरी जो तिरंगा साकारला असेल त्या ध्वजासोबतची एक सेल्फी घेवून आपले पूर्ण नाव व पत्ता ९८७०९५५५०५ या व्हॉटस्‌ॲप क्रमांकावर पाठवून सन्मानपत्र प्राप्त करावे असे आवाहन नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांनी केली आहे. त्याचप्रमाणे तिरंगा ध्वज हा कागदाचा किंवा प्लास्टिकचा नसावा. तिरंग्यासोबत सेल्फी घेताना तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी. या अभियानात सहभागी नागरिकांना १८ ऑगस्टपर्यंत सन्मानपत्र दिले जाईल. याबाबतची नियमावलीची माहिती पत्रिका जाहिर केली आहे. दरम्यान, रायगडकरांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपल्या अस्मितेचे प्रतिक असलेल्या तिरंगा ध्वजाला घरोघरी लाऊन त्या सोबतची एक सेल्फी घेवून आमच्या उपक्रमास उत्तम प्रतिसाद द्यावा असे मत महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज पाटील यांनी या दरम्यान व्यक्त केले आहे.

# भाजपची नवी मुंबईत तिरंगा रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप नवी मुंबई अध्यक्ष रामचंद्र घरत व बेलापूर विधानसभा आमदार मंदा म्हात्रे यांनी तुर्भे येथे हरघर तिरंगा अभियानाच्या प्रचारार्थ रॅलीचे आयोजन केले होते. तसेच प्रभाग क्रमांक २५मधील एसएससी बोर्डातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार या वेळी करण्यात आला.



हरघर तिरंगा मोहीम घराघरात पोहोचली आहे. देशाला १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी फडकविलेला ध्वज पाळण्याचे आवाहन केले जात असताना, नवी मुंबईचे भाजप अध्यक्ष रामचंद्र घरत आणि आमदार मंदा म्हात्रे यांनी तिरंगा फडकविण्याचे महत्त्व सांगण्यासाठी भव्य रॅली काढली. या कार्यक्रमादरम्यान प्रभाग क्र. २५मधून एसएससी बोर्डाच्या परीक्षेत ८० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या २५ गुणवंत विद्यार्थ्यांचा रामचंद्र घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना बॅग, ड्रेस आणि छत्रीसह उच्च शिक्षणासाठी पुस्तके निधीसाठी रोख भेट देण्यात आली.

रॅलीत भाजपचे ४०० पेक्षा अधिक सदस्य आणि संपूर्ण नवी मुंबईतील भाजपचे अनेकजण सामील झाले होते. रॅलीत माजी तुर्भे सरपंच डी. डी. घरत, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा दुर्गा डोके, युवा मोर्चा अध्यक्ष दत्ता घंगाळे, सरचिटणीस कृष्णा पाटील, उपाध्यक्ष संकेत डोके व राजाराम पाटील, उत्तर भारतीय आघाडीचे अध्यक्ष राजेश राय, तुर्भे मंडल अध्यक्ष सुरेश अहिवले, ओबीसी जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, तुर्भे वॉर्ड अध्यक्ष नारायण पाटील आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रणवीर सिंगला पोलिसांचे समन्स

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंगने केलेल्या न्यूड फोटोशूटमुळे एकच वादंग माजले. त्याच्या या फोटोंना पाहून संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या. काहींनी रणवीरला पाठिंबा दिला, तर काहींनी त्याच्यावर टीका केली. याच प्रकरणात रणवीर सिंगवरविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत चेंबूर पोलिसांनी रणवीरला समन्स बजावले आहे.

येत्या २२ ऑगस्ट रोजी पोलिसांसमोर हजर राहण्याचे निर्देश रणवीरला देण्यात आले आहेत. रणवीर सध्या मुंबईबाहेर आहे. त्यामुळे येत्या १६ ऑगस्ट रोजी ही नोटीस त्याला सोपवली जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार न्यूड फोटोशूटप्रकरणी रणवीरविरोधात मुंबईमध्ये एक महिला वकील आणि एका खासगी संस्थेच्या पदाधिकाऱ्याने पोलिसात तक्रार दाखल केलीय.

# अतिवृष्टीमुळे घर कोसळून रोह्यात बालक गंभीर जखमी



**नागोठणे : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे घर कोसळून लहान बालक जखमी होण्याची घटना शुक्रवारी (दि. १२) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास रोहा तालुक्यातील पलस ग्रामपंचायत हद्दीत घडली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून परिसरात अतिवृष्टी सुरू असून त्यात स्थानिक रहिवासी रोहिदास घासे यांचे घर कोसळून त्यात त्यांचा तीन वर्षीय मुलगा रियांश घासे हा गंभीर जखमी झाला. सगळीकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना या दुर्दैवी घटनेबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. रोहिदास घासे आणि त्यांचे कुटुंबीय झोपेत असतानाच ही घटना घडली. परीसरात रात्रभर पाऊस सुरू होता. सकाळीदेखील पावसाचा जोर कायम राहिला.

पावसासह वादळीवाराही सुरू असल्याने त्यातच घासे यांचे घर कोसळले. घराच्या छताचा भाग रिद्धी घासे (९) व रियांश घासे (३) यांच्यावर पडल्याने त्यात ते जखमी झाले. रियांश हा गंभीर जखमी झाला आहे. शेजाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना पुढील उपचारासाठी एमजीएम पनवेल येथे हलविण्यात आले आहे.

# फिलिपाईन्सची बोट अलिबागजवळील नवगाव समुद्रातील खडकात अडकली

## पाच प्रवाशांची सुखरूप सुटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुरूडजवळ समुद्रात गुजरातमधील बोट भरकटल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी (दि. १२) रोजी फिलिपाईन्स देशातून आलेली बोट अलिबागजवळ नवगाव येथील समुद्रातील खडकात अडकली. यातील पाच प्रवाशांना तटरक्षक दल, जिल्हा पोलीस, नौदल, अग्निशमन दल, सीआयएसएफ पथकाच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढण्यात आले.



एक भारतीय आणि चार परदेशी नागरिक असलेली फिलिपाईन्सची बोट दुबई येथून कोचीन, मालदिवमार्गे मुंबईत आली होती. या बोटीत करुणा निधन पांडे (भारतीय), बाथी सार (सेनेगल), कारमेन क्लारे लातुंबो सल्वनी, जयरालड फजनोय नाला आणि मार्कोनी फाब्रो फर्नांडीस (फिलिपाईन्स) असे प्रवासी होते.

तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ही बोट रेवस बंदरात उभी होती. गुरुवारी (दि. ११) मध्यरात्रीच्या सुमारास बोटीत तांत्रिक बिघाड दुरूस्त करून पुन्हा सर्व जण पुढील प्रवासाला निघाले, मात्र सोसाट्याचा वारा व समुद्रही खवळलेला असल्याने बोट भरकटली. पुढील धोका लक्षात घेत कप्तानने बंदराजवळ बोट नांगरून ठेवली, पण ही बोट सरकत नवगावजवळ आली.

या वेळी बोट खडकावर आपटल्यामुळे तिला छिद्र पडले. त्यामुळे बोटीत पाणी शिरले. परिणामी बोटीच्या सोलर पॅनलच्या बॅटरींना अचानक आग लागली. त्यावेळी मोठा अनर्थ होण्याची शक्यता होती. प्रसंगावधान राखून बोटीतील प्रवाशांनी संबधित अधिकारी यांना मदतीसाठी संपर्क केला. तटरक्षक दलाच्या हेलिकॉप्टरने बोटीत पाचही जणांना शुक्रवारी सकाळी सुखरूप बाहेर काढले.

**सांस्कृतिक कट्टा**

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**गाथा स्वातंत्र्याची**

(एक संगीत महापर्व)

(प्रवेश विनामूल्य)

(१३ ऑगस्ट, सायं. ७ वा.)

पान १ वरून

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शाळा इमारतीचे उद्घाटन



शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन अनंता ठाकूर, वामनशेठ म्हात्रे, पंढरीनाथ घरत, बाबुराव कांबळे, साई मोकल, किशोर घरत, कमलाकर घरत, साई मोकल, हनुमान घरत, रघुनाथ देशमुख, किशोर घरत, आनंदी घरत, नंदा भोईर, इंदूताई म्हात्रे, सुनीता घरत, उलवे नोड उपाध्यक्ष सुजाता पाटील, सी. एल. ठाकूर, सिडकोचे अधिकारी श्री. भितले, श्री. भावरे, केंद्र प्रमुख एस. एम. जोशी, सुधीर ठाकूर, ग्रामविकास अधिकारी श्री. राठोड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कोपर येथील जि. प. शाळेची नवीन इमारत सिडकोच्या माध्यमातून बांधण्यात आली आहे. या शाळा व मैदानासाठी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत आणि महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष अनुसया घरत यांनी जागा दिली असून त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन सोहळ्यात सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे या शाळेसाठी माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर घरत यांनी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली असून मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. याशिवाय गव्हाण ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेसाठी आठ टेबल, दोन ऑफिस खुर्च्या, दोन कपाटे, आठ छोट्या खुर्च्या, तर विजय घरत यांच्या माध्यमातून शाळेतील सात वर्गखोल्यांसाठी सात घड्याळे आणि मध्यवर्ती ठिकाणी एक मोठे घड्याळ देण्यात आले आहे. याबद्दलही त्यांचा सत्कार करण्यात आला.




पनवेल भाजपतर्फे

**जनहितार्थ**

माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**

**शनिवार, दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. काळभैरव कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ उपकेंद्र, नावडे

**ग्रामिण लसीकरण**

■ धरणा ■ चाळ/नागझरी ■ ढोंगऱ्याचापाडा ■ बीड/खुटारी/एकटपाडा

■ सिद्धी करवले ■ भिंगारी

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


**उरण नगरपरिषद, उरण**

**निविदा सूचना**

जा.क्र. उनप/बा.वि./१९७६/२०२२-२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : १२/०८/२०२२

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद बांधकाम विभागाकडील मोरा रोड कोर्टा समोरील गटारावर RCC चेंबर बांधणे त्यावर लोखंडी झाकण बसविणे. | रु. १०००/- | रु. २००/- |

**अटी/शर्ती :-**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक १६/०८/२०२२ ते दिनांक २६/०८/२०२२ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास बांधकाम विभागात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक १६/०८/२०२२ ते दिनांक २८/०८/२०२२ रोजीचे सायं. ४.०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोन लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक २९/०८/२०२२ रोजीचे दुपारी ४.०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

सही/-
(संतोष माळी)
मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण

## एमएनएम स्कूल व टीएनजी कॉलेजमध्ये अटल टिंकरिंग लॅब

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शिक्षण देण्यासाठी नेहमीच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्या अंतर्गत संस्थेच्या गव्हाण विभागातील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेमध्ये (टीएनजी) अटल टिंकरिंग लॅब सुरू करण्यात आली आहे. या लॅबचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १२) झाले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, नवीन आधुनिक जग घडत असताना अटल टिंकरिंगची धारणा महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन करीत येत्या देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सर्वांनी हर घर तिरंगा अभियानात उस्त्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश औद्योगिक आणि आर्थिक दृष्टीने मजबूत बनत आहे, असे मत व्यक्त केले.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव सिद्धेश्वर गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, रघुनाथ देशमुख, सुधीर ठाकूर, छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, पंचायत समितीचे अधिकारी अभिजीत मटकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शिरढोण येथे स्वराज्य भूमी कोकण यात्रा

# आमदार प्रवीण दरेकर यांचे अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण प्रदेश संघटना आणि ग्लोबल कोकणच्या वतीने स्वराज्य भूमी कोकण यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेंतर्गत १२ ते १५ ऑगस्टदरम्यान सर्व महानायकांच्या गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन कृतज्ञता व्यक्त करणे आणि जनजागृती करण्यात येत आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या पनवेलमधील शिरढोण या गावी भाजप नेते विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी (दि. १२) भेट देऊन अभिवादन केले.

कोकण ही देशाची स्वराज्य भूमी आहे. म्हणूनच अनेक राष्ट्रपुरुष या भूमीतून निर्माण झाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या महानायकांमध्ये कोकणची भूमी कायम अग्रणी राहिली. म्हणूनच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त समृद्ध कोकण प्रदेश संघटना आणि ग्लोबल कोकणच्या वतीने हा प्रेरणादायी इतिहास पुढच्या पिढीपर्यंत यावा, याकरिता स्वराज्य भूमी कोकण यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी ग्लोबल कोकण समृद्ध कोकण प्रदेश संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय यादवराव, भाजपचे केळवणे जि. प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सरपंच साधना कातकरी, प्रितेश मुकादम, उपसरपंच रेश्मा वाजेकर, माजी उपसरपंच प्रमोद कर्णेकर, विजय भोपी, मोनाली घरत, निकिता चौधरी, संगीता चौधरी, सनीका कातकरी, भाऊ वाजेकर, गजानन घरत, मंधार जोग, मयुर टकले, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याने चित्रकला स्पर्धेत पटकाविला प्रथम क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत नवी मुंबईतील दोन हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या पाचवी इयत्तेतील उद्दीपन बिश्वास या विद्यार्थ्याने सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला.

ही स्पर्धा नवी मुंबईतील पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागामार्फत आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील सहभागी २,२०० विद्यार्थ्यांमधून उद्दीपन बिश्वास याने प्रथम क्रमांक पटकाविला. त्याला राष्ट्रीय ध्वज, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. या विद्यार्थ्याचे संस्थचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# पनवेलमध्ये नारळीपौर्णिमेनिमित्त मिरवणूक; मान्यवरांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उसळेल्या सागराला शांत करण्यासाठी सोन्याने मढवलेला नारळ अर्पण करून कोळी बांधवांनी नारळीपौर्णिमेचा सण गुरुवारी (दि. ११) मोठ्या उत्साहात साजरा केला. यानिमित्त पनवेल कोळीवाडा आणि तक्का कोळीवाड्यात ढोल–ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. कोळी बांधव पारंपरिक वेशभूषा करून मिरवणुकीत सहभागी झाले होते. पनवेल कोळीवाडा येथे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नारळ अर्पण करण्यात आला.

नारळीपौर्णिमेच्या दिवशी सागराला सोन्याचा नारळ अर्पण केल्यानंतर कोळी बांधव मासेमारीला सुरुवात करतात. पनवेल आणि तक्का कोळीवाड्यात गुरुवारी कोळी बांधव आपल्या पारंपरिक वेशभूषेत या मिरवणुकीत सहभागी झाले होते. या वेळी आगरी कोळी समाजात प्रसिद्ध असेलेल्या ब्रास बँड पथकाने आपली पारंपरिक गिते वाजवात सोहळ्यात रंगत आणली होती. गुरुवारी दुपारी नारळाची विधीवत पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करण्यात आला.

पनवेल कोळीवाडा येथे नारळीपौर्णिमा मिरवणुकीच्या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका रुचिता लोंढे, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, पोलीस निरीक्षक संजय जोशी, हरिश्चंद्र कोळी, मदन कोळी, महेंद्र उरणकर, कमलाकर कोळी, एकनाथ भोईर, गजानन भगत, प्रभाकर भोईर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते, तर तक्का कोळीवाडा येथे भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते प्रतीक बहिरा उपस्थित होते.

पनवेल कोळीवाडा येथे नारळीपौर्णिमनिमित्त आयोजित कार्यक्रमात दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये सुयश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# फुंडे हायस्कूलमध्ये क्रांती दिन

## स्वातंत्र्याची दिंडी व स्वच्छता अभियान



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अंतर्गत क्रांती दिन, स्वातंत्र्याची दिंडी व स्वच्छता अभियान असा तिहेरी कार्यक्रम झाला. क्रांती दिनाचा कार्यक्रम इयत्ता नववीच्या वर्गाने वर्गशिक्षक आर. जी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा केला. क्रांती दिनानिमित्त भारतीय क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर फुंडे हायस्कूल ते जसखार गावात स्वातंत्र्याची दिंडी काढण्यात आली. या वेळी विद्यलयाच्या प्राचार्य आदरणीय सुनिता वर्तक, पर्यवेक्षक जे. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे यांनी स्वतः हातात तिरंगा घेऊन घोषणा देत दिंडीला प्रारंभ केला. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचा जयघोष करणारी घोषवाक्य बनवलेली पोस्टर्स तसेच तिरंगा झेंडा हातात अभिमानाने झळकवत, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव चिरायू होवो, वंदे मातरम्, हर घर तिरंगा अशा घोषणा देत खऱ्या अर्थाने रॅलीची शोभा वाढविली. सर्व शिक्षकवृंदही घोषणा देत या रॅलीत सहभागी झाले होते.

लेझीम पथकाच्या तालावर स्वातंत्र्याच्या घोषणा देत जसखार गावात प्रभातफेरी झाली. त्यानंतर स्वच्छता विभाग प्रमुख दिगंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी रत्नेश्वरी मंदिराच्या परिसराची स्वच्छता केली. या वेळी जसखार गावचे सरपंच दामोदर घरत, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र सातंगे, सदस्य रीना भोईर, प्रतीक्षा ठाकूर, सर्व सदस्य, फुंडे हायस्कुल स्कूल कमिटी सदस्य सुरेश म्हात्रे, ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. या वेळी वाहतूक विभाग अधिकारी घरत यांचेही सहकार्य लाभले. या स्वातंत्र्य दिंडीचे नियोजन सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील यांनी केले होते.

## तळोजात दुकानाला आग; लाखोंचे सामान जळून खाक

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील तळोजा मजकूर गावातील एका दुकानाला शुक्रवारी (दि. १२) रात्री दीड वाजता भीषण आग लागली. आगीत सामानसहित संपूर्ण दुकान जळून खाक झाले. यामध्ये कोणतीही जीवितहानी सुदैवाने झाली नाही, मात्र लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आग विझवण्यासाठी तळोजा व खारघर अग्निशामक दलाला पाचारण करावे लागले. आग कशामुळे लागली याचे कारण मात्र समजू शकले नाही.

तळोजा मजकूर येथे सागवानी घरामध्ये दुकान होते. शुक्रवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास दुकानात अचानक आग लागली. ग्रामस्थांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र लाकडी सामान जास्त असल्याने आग भडकली. तातडीने तळोजा व खारघरमधील अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. काही वेळाने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, मात्र तोपर्यंत दुकानातील सामान जळून भस्मसात झाले. याबाबत तळोजा पोलिसांनी जबाब नोंदविला.

# उरण शहरात घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत रॅली





**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण असल्याने घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत जनजागृती करण्यासाठी उरण नगर परिषदेच्या वतीने शुक्रवारी (दि. १२) शहरातील पेन्शनर पार्क येथून रॅली काढण्यात आली.

या रॅलीत नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका दमयंती म्हात्रे, मुख्याधिकारी संतोष माळी, अभियंता झुंबर माने, सुरेश पोसतांडेल, हरेश तेजी, भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील, पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, पंडित पाटील, विजय कावळे, सोनावणे, भीमराज शिंदे, युवराज जाधव, हितेश शहा, जसिम गॅस, संगिता ढेरे, वैशाली पाटील, अभया म्हात्रे, शिल्पा साळुंखे, सुवर्णा बोरलीकार, सारिका भोईर, मीनाक्षी पाटील, रुपाली पालकर, संजय पवार, आकाश कडवे, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी असोसिएशन, ज्येष्ठ नागरिक संस्था, पोलीस अंमलदार, वाहतूक विभागाचे अधिकारी, फायर ब्रिगेड कर्मचारी आदी सहभागी झाले होते.





**पनवेल : मनपाच्या माजी नगरसेविका निता माळी यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त केंद्र शासनाच्या घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत नागरिकांना तिरंगा झेंडावाटप केले. या वेळी सागर नलावडे, चंद्रकांत जाधव, रोहित जाधव, फरान शेख आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपच्या खांदा कॉलनी महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री पोवार यांच्या वाढदिवसानिमित्त घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत शुक्रवारी रायगड जिल्हा भाजप कार्यकारिणी सदस्य भिमराव पोवार यांच्यातर्फे तिरंग्याचे मोफत वाटप करण्यात आले.**

## खांदा कॉलनीत मोफत तिरंगा वाटप उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घरोघरी तिरंगा उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी भाजयुमोचे खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक संजय भोपी यांच्या वतीने खांदा कॉलनीमधील नागरिकांसाठी मोफत तिरंगा वाटपाचा कार्यक्रम खांदा कॉलनी, सेक्टर १३ येथील स्व. संजय भोपी जनसंपर्क कार्यालय येथे होणार आहे. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अभिषेक भोपी यांनी केले आहे.




## संपादकीय

# रेवड्यांचे राजकारण

राजकीय स्वार्थासाठी काही राजकीय पक्ष उद्या पेट्रोल-डिझेल फुकट देण्याची घोषणा सुद्धा करतील अशी भीती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच व्यक्त केली. पंतप्रधानांच्या या उद्गारांनंतर देशामध्ये भारतीय जनता पक्ष विरुद्ध अन्य पक्ष असा वाद पेटला. यात सर्वाधिक मिरच्या झोंबल्या त्या दिल्लीच्या आम आदमी पक्षाला. पंतप्रधानांनी केलेली टीका 'आप'चे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी फारच मनाला का बरे लावून घेतली असावी?

**निवडणूक प्रचार काळामध्ये जनतेला मोफत चीजवस्तूंचे वाटप करण्याची खोड अनेक राजकीय पक्षांना लागली आहे. तशा प्रकारचे वाटप खरोखरच होते की नाही हे परिस्थितीवर ठरत असेल, परंतु मोफत सोयीसवलतींची खैरात करण्याची आश्वासने मात्र नेहमीच दिली जातात. ती पूर्ण करण्याची जबाबदारी सत्तेवर आलेल्या पक्षांची कधी नसतेच. काही पक्ष मात्र सरकारी तिजोरीचा विचार न करता खरोखरच मोफत चीजवस्तूंचे वाटप मोठ्या प्रमाणावर करतात. मोफत वीजेपासून सायकलींपर्यंत किंवा गॅस सिलेंडरपासून लॅपटॉपपर्यंत अनेक गोष्टींचे वाटप सरकारी तिजोरीमधून होते. हा सर्व पैसा अंतिमत: करदात्यांकडूनच गोळा केलेला असतो. 'आयजीच्या जीवावर बायजी उदार' या म्हणीनुसार केवळ मतांसाठी राजकीय पक्ष या मोफत घोषणांच्या नादाला लागतात. महागाईच्या दिवसांत फुकट मिळणाऱ्या गोष्टींचे आकर्षण सर्वसामान्यांना असणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. परंतु राज्य चालवण्याचा अर्थ प्रामुख्याने राज्याची अर्थव्यवस्था चालवणे असा होतो. मोफत वाटप केले की अर्थव्यवस्थाच बिघडून जाते आणि शेवटी त्याची किंमत त्या राज्याच्या नागरिकांनाच भोगावी लागते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यंतरी याच वृत्तीला रेवड्या वाटण्याची उपमा दिली होती. उत्तर प्रदेशातील एका विकास प्रकल्पाचे अनावरण करताना पंतप्रधानांनी या ज्वलंत विषयाला हात घातला होता. अशातऱ्हेने जनतेवर मोफत सोयीसवलतींची खैरात करण्यामध्ये दिल्लीचे सरकार आघाडीवर आहे. हे सारे मतांसाठी केले जात आहे हे तर मतदारांना देखील कळते. आता हा वाद सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. ज्येष्ठ कायदेपंडित अश्विनी उपाध्याय यांनी जनहित याचिकेद्वारे हा विषय सर्वोच्च न्यायालयात नेला आहे. उपाध्याय यांनी आपल्या याचिकेत जनतेला मोफत सुविधा देण्याच्या घोषणांवर बंदी घालावी आणि त्याचवेळी राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांचे नियमन करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत अशी मागणी केली आहे. पंतप्रधानांचे उद्गार आणि सर्वोच्च न्यायालयातील याचिका यावर टीका करताना 'आप'ने वेगळाच प्रश्न उपस्थित केला आहे. जनकल्याणासाठी मोफत सुविधा देण्यास केंद्रसरकारचा विरोध आहे काय असा केजरीवाल यांचा सवाल आहे. अर्थात याबद्दल सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद सुरू असताना सरन्यायाधीश रामण्णा यांनी, मोफत योजना आणि कल्याणकारी योजना यात फरक असल्याचे नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाचा एकंदरीत कल या रेवड्यांच्या राजकारणाला पायबंद घालण्याकडेच असावा असे माननीय न्यायमूर्तींच्या शेऱ्यांवरून दिसते. तथापि, हा वाद न्यायालयात सुटणारा नाही हे लक्षात घ्यायला हवे. आश्वासने देताना किंवा सोयीसुविधा उपलब्ध करून देताना राजकीय पक्षांनी तारतम्य दाखवावे इतकाच खरे तर मुद्दा आहे. परंतु दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही. एकगठ्ठा मते मिळवण्याच्या लोभापायी राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात भरमसाठ आश्वासने देतात आणि निवडून आल्यास मोफत सोयीसुविधांच्या नावाखाली जनतेचाच पैसा जनतेवर उधळतात हे आपल्या लोकशाहीचे खरे दुखणे आहे.**

# पालीकरांना शुद्ध पाण्याची प्रतीक्षा



**खबरबात**
**धम्मशील सावंत**

महाराष्ट्रातील प्रख्यात अष्टविनायक तिर्थक्षेत्र असलेल्या पाली शहराला तेथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. पावसामुळे अंबा नदीचे पाणी गढूळ चिखलयुक्त झाले आहे. तसेच शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट अंबा नदीपात्रात सोडले जात आहे. त्यामुळे हे प्रदूषित पाणी पिणारे नागरिक आणि भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला खेळ कधी थांबणार हा मोठा प्रश्न आहे.

पाली शहरात मूळात सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा कोणताच प्रकल्प नाही. तसेच तब्बल २७ कोटींची शुद्धपाणी योजनादेखील लालफितीत अडकलेली आहे. परिणामी भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे प्रदूषित पाणी वापरावे लागत आहे. आतापर्यंत नळाच्या पाण्यातून साप, बेडूक, शंखशिंपले व मासे आदी प्राणी आले आहेत. याबरोबरच शेवाळ, चिखल हे नेहमीच येत असते. तसेच आजुबाजूच्या काही कारखान्यांतून प्रदूषित पाणीदेखील अंबा नदीमध्ये सोडले जाते. प्रदूषित व घाणपाणी नाईलाजाने लोकांना वापरावे लागते. अनेक नागरिक प्रदूषित पाणी पिण्यापेक्षा कूपनलिका व विहीरीचे पाणी पिण्यावर भर देत आहेत. बहुतांश जण विकतचे बाटलीबंद पाणी पितात. त्यामुळे लोकांना भुर्दंड पडत आहे. नियमित पाणीपट्टी



भरूनदेखील लोकांना असे प्रदूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. संबधित प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. अशा या प्रदूषित पाण्यापासून आमची सुटका करावी असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. या दूषित पाण्याचा परिणाम येथील मासे व जलचर प्राण्यांवरदेखील होत आहे.

अलिकडेच पाली ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये झाले आहे. शिवाय नगरपंचायत निवडणुकीत पाणीप्रश्न पुढे आला होता. या वेळी पालीसाठी शुद्धपाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन देण्यात आले होते. ही आश्वासने नक्की प्रत्यक्षात केव्हा उतरणार या आशेवर पालिकर नागरिक आहेत. मूळात पिण्याच्या शुध्द पाण्याकडे स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

दरम्यान, कोटींची मंजूर शुद्धपाणी योजना कार्यान्वित करण्यात कोणत्याच अडचणी नसताना यासाठी थांबून काय फायदा आहे. याबाबत कुणीही विचार करत नाही, असे पालिकरांचे म्हणणे आहे. शुद्धपाणी योजना लागलीच कार्यान्वित करुन हा पाणीप्रश्न सोडवावा अशी मागणी पालिकरांची आहे.

### शुद्ध नळपाणी योजना लालफितीत

*शासनाने केलेल्या २००८-०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणाऱ्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण सात कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणीद्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये ही योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्नदेखील होता. मात्र पालीला 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. तसेच शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात आली आहे. सध्यस्थितीत ही योजना २७ कोटींवर गेली आहे.*

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करूया!

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतविलेले स्फुल्लिंग कायम तेवत राहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राहावी, या उद्देशाने या देदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दि.१३ ऑगस्ट ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन परिपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियानासाठी ग्रामीण विकास विभागास राज्य समन्वय संस्था म्हणून नामनिर्देशित केले आहे. शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने या उपक्रमाबाबतच्या दिलेल्या महत्वाच्या सूचना जाणून घेणे गरजेचे आहे.

राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/ निमशासकीय / खासगी अस्थापना /सहकारी संस्था / शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करणे अपेक्षित आहे. उपक्रमासाठी ग्रामीण भागात जवळपास १.४६ कोटी कुटुंबे / घरे असून इतर कार्यालये, संस्था मिळून १.५० कोटी ध्वज फडकवता येईल असा अंदाज आहे. राष्ट्रभक्तीचा हा उत्सव सर्वांनी साजरा करुया.

**-मनोज सानप, रायगड**
**जिल्हा माहिती अधिकारी**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइलमध्ये 'हा' नंबर हवाच! जाणून घ्या कारण..

कधी कुठल्या डॉक्युमेंटची गरज लागेल हे सांगणे कठीणच आहे, पण त्यासाठी सर्व अधिकृत कागदपत्र रोज आपण सोबत घेऊन तर फिरू शकणार नाहीच. अशावेळी तुम्हाला हवे तेव्हा आणि लागेल ते डॉक्युमेंट तुमच्या व्हॉटस्‌अ‍ॅप नंबरवर मिळाले तर अर्धे प्रश्न सुटणार आहेत. भारत



सरकारच्या एका नव्या उपक्रमासह हे आता अगदी शक्य आहे. सरकारतर्फे एक व्हॉटस्‌अ‍ॅप हेल्प डेस्क नंबर लॉंच करण्यात आला आहे. जो वापरून आपण आपल्या कोविड लसीकरणाचे प्रमाणपत्र तसेच तुमच्या डिजीलॉकर अकाउंटमधील महत्त्वाची कागदपत्रे काही क्षणात मिळवू शकता.

भारत सरकारतर्फे ९०१३१५१५१५ हा क्रमांक जारी करण्यात आला आहे. हा क्रमांक आपण आपल्या फोनमध्ये सेव्ह करून यावर व्हॉटस्‌अ‍ॅप चॅट करू शकता. याच नंबर वरून आपल्याला कागदपत्रे उपलब्ध होतील. तसेच व्हॉटस्‌अ‍ॅप असे कोविड प्रमाणपत्र मिळवू शकता. वर नमूद केलेला क्रमांक फोनमध्ये सेव्ह केल्यावर एक मॅसेज करा. आपल्याला उपलब्ध सेवांची माहिती मिळेल. यात आपल्याला हवी ती सेवा निवडून मॅसेज करा. तुम्हाला तुमचा कोविड नोंदणीत वापरलेला मोबाईल क्रमांक विचारला जाईल, जर व्हॉटस्‌अ‍ॅप नंबर तोच असेल तर तसाही पर्याय दिला जाईल, योग्य पर्याय निवडा. तुम्हाला यानंतर थेट तुमचे प्रमाणपत्र व्हॉटस्‌अ‍ॅपवर पाठवले जाईल.

आपण आपल्या महत्त्वाच्या कागदपत्रांची सॉफ्टकॉपी डिजीलॉकर वर सेव्ह करून ठेवून या नंबर वरून हवी तेव्हा व्हॉटस्‌अ‍ॅप वर मिळवू शकता. जर अगोदरच आपले डिजीलॉकरवर अकाउंट असेल तर आपल्याला आधार कार्ड क्रमांक विचारून थेट आवश्यक कागदपत्रांची यादी दाखविली जाईल. कागदपत्रांच्या यादीतील हवे असलेले डॉक्युमेंट निवडून तुम्ही त्याची ऑनलाईन प्रत मिळवू शकाल. भारत सरकारच्या माहितीनुसार हा क्रमांक अधिकृत व सुरक्षित असल्याने यावरून कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. मात्र वापरकर्त्यांनी नंबर कॉपी करताना काळजी घ्यावी. तसेच कोणतीही शंका आल्यास आपण सायबर सेलची मदत घेऊ शकता. दरम्यान, व्हॉटस्‌अ‍ॅप हे महत्त्वाचे अ‍ॅप आज ठरले आहे. मात्र त्यांचा किती चांगला वापर करतो हेही महत्त्वाचे आहे.

# बहुआयामी व्यक्तीमत्व आचार्य प्रल्हाद अत्रे



आचार्य अत्रे तथा प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट, १८९८ रोजी पुणे जिल्ह्यातील सासवड जवळील कोडित खुर्द या गावी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील लिपिक होते आणि काही काळासाठी सासवड नगरपालिकेचे सचिव होते आणि त्यांचे काका एमईएस वाघिरे हायस्कूल सासवड येथे शिक्षक होते. सासवडच्या एमईएस वाघिरे हायस्कूलमधून त्यांनी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १९१९मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केले. पुणे विद्यापीठातून त्यांनी कला शाखेची पदवी पूर्ण केली. पदवीनंतर अत्रे यांनी शाळेत शिक्षक म्हणून काम केले. अत्रे यांनी १९२८मध्ये लंडन विद्यापीठातून शिक्षक पदविका घेतली. भारतात परत येण्यापूर्वी त्यांनी सिरिल बर्ट यांच्या हाताखाली प्रायोगिक मानसशास्त्राचा अभ्यास केला आणि हॅरो येथे अध्यापन केले. १९२३मध्ये अत्रे यांनी 'अध्यापन' मासिक सुरू केले. त्यांनी १९२६मध्ये 'रत्नाकर' व १९२९ मध्ये 'मनोरमा', आणि पुढे १९३५मध्ये 'नवे अध्यापन' व १९३९ मध्ये 'इलाखा शिक्षक' ही मासिके काढली. १९ जानेवारी १९४०मध्ये त्यांनी नवयुग साप्ताहिक सुरू केले. ८ जुलै १९६२पर्यंत ते चालू होते. २ जून १९४७ रोजी अत्रे यांनी जयहिंद हे सांजदैनिक सुरू केले, परंतु ते वर्षभरच चालले. १५ नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांनी मराठा हे दैनिक सुरू केले. ते त्यांच्या हयातीनंतरही काही काळ प्रकाशित होत होते. २१ जानेवारी १९४०ला अत्रे यांनी नवयुग हे वृत्तपत्र सुरू केले. आचार्य अत्रे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावे अनेक संस्था स्थापन झाल्या. १९३४मध्ये सरस्वती सिनेटोनच्या दादा तोरण्यांच्या आग्रहाखातर नारद-नारदी चित्रपटाची कथा व संवाद अत्रे यांनी लिहून दिले. हंस पिक्चर्ससाठी १९३७मध्ये त्यांनी इब्सेनच्या 'पिलर ऑफ द सोसायटी' या कथेवरून धर्मवीर, स्वतःच्याच कथांवरून प्रेमवीर या मराठी व 'बेगुनाह' या हिंदी चित्रपटांच्या पटकथा लिहून दिल्या. १९३८ मध्ये 'हंस' साठीच 'ब्रह्मचारी' चित्रपटाची कथा त्यांनी लिहून दिली. त्यांनी लिहिलेला 'ब्रँडीची बाटली' हा चित्रपटही लोकप्रिय ठरला.

१९४० मध्ये नवयुग पिक्चर्सतर्फे 'लपंडाव' चित्रपटाची कथा अत्रे यांनी लिहिली. 'लपंडाव' चित्रपटानंतर त्यांनी 'संत सखू' या चित्रपटाचे संवाद लिहिले. त्यांनी अध्यापनही केले. मुंबईत पहिले सहा महिने सँढर्स्ट हायस्कूलमध्ये इंग्रजी व गणित शिकविले. त्यानंतर रॉबर्ट मनी स्कूलमध्ये एक महिना वर्गशिक्षक व त्यानंतर फोर्टमधल्या न्यू स्कूलमध्ये संस्कृत शिक्षक म्हणून नोकरी केली. पुण्याला कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत १८वर्षे मुख्याध्यापक म्हणून लौकिक मिळविला व शाळेचा मोठा विस्तार केला. त्यावेळी त्यांना फक्त ३५ रुपये पगार होता. ही शाळा अत्र्यांच्या नाट्यलेखनाची, समाजसेवेची प्रयोगशाळाच होती. जातिभेदाच्या भिंती फोडण्याचा मंत्र अत्रे यांना या शाळेतच मिळाला. जून १९२४मध्ये मुंबईच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण घेऊन बी. टी. परीक्षेत वर्गात प्रथम आले व त्यानंतर १९२७ ते १९२८ दरम्यान इंग्लंडला टिचर्स डिप्लोमा मिळविला. पुण्यात राजा धनराज गिरजी व मुलींची आगरकर हायस्कूल यांची स्थापना केली. प्राथमिक शाळेसाठी नवयुग वाचनमाला व दुय्यम शाळेसाठी अरुण वाचनमाला या दोन क्रमिक पुस्तकांच्या माला लिहिल्या. १९३७ मध्ये शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज काढले. आचार्य अत्रे यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले.

**-साभार विकीपिडिया**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : कोळी बंधू-भगिनींचा नारळीपौर्णिमा सण गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त शहरातील उरण रोड येथील कोळेश्वर चौकाला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. हौशी लोक या ठिकाणी थांबून फोटो, सेल्फी घेत होते.**

## आरोग्य प्रहर

# काही पदार्थही स्वभावावर करू शकतात परिणाम

काही माणसे अशी असतात की त्यांना लगेच राग येत नाही. मात्र काही लोक लहान लहान गोष्टींवरून लगेचच चिडतात. राग येण्याची अनेक करणे असू शकतात.



जसे की, आर्थिक समस्या, कौटुंबिक किंवा कार्यालयीन तणाव इत्यादी. मात्र आपल्या आहारातील काही पदार्थही आपल्या स्वभावावर परिणाम करू शकतात. म्हणजेच काही पदार्थांच्या सेवनाने आपला राग वाढू शकतो. आपण आपल्या आहारात ज्या पदार्थांचा समावेश करतो, त्यांचा आपल्या आरोग्याबरोबरच आपल्या स्वभावावरही मोठा फरक पडत असतो. विशिष्ट पदार्थांचे विशिष्ट गुणधर्म असतात. काही पदार्थांचा गुणधर्म थंड असतो तर काहींचा उष्ण. पदार्थांचे हे गुणधर्म आपल्या शरीरावर परिणाम करत असतात. एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, काही पदार्थांच्या अतिसेवनाने आपल्या स्वभावात बदल होऊ शकतो. आज आपण जाणून घेऊया, हे पदार्थ कोणते कोणते आहेत.

**टोमॅटो**-टोमॅटो एक अशी भाजी आहे, ज्याशिवाय आपण बनविलेल्या पदार्थांची चव अपूर्ण राहते. हे खाण्याचे अनेक फायदे आहेत, परंतु यामुळे शरीरातील उष्णता वाढते आणि माणसाला राग येऊ शकतो. ज्यांना लवकर राग येतो त्यांनी टोमॅटो मूळातच कमी खावेत.

**फ्लॉवर**- फ्लॉवर खाल्ल्याने तुमच्या शरीरात जादा हवा तयार होऊ लागते, त्यामुळे गॅस आणि पोट फुगण्याचा धोका असतो आणि हेच तुमच्या रागाचे कारण बनते. हीच समस्या ब्रोकोलीच्या बाबतीत उद्भवते.

**वांगे**-वांग्यामध्ये आम्लयुक्त पदार्थ जास्त असतात. ज्यामुळे तुमच्या मनात राग निर्माण होतो. जर तुम्हाला वाटत असेल की, ही भाजी खाल्ल्यानंतर तुम्हाला राग येऊ लागला तर हे खाणे कमी करा. सुका मेवा आहारात असावा असे म्हटले जाते. अनेक आरोग्य तज्ञ चांगल्या आरोग्यासाठी सुका मेवा खाण्याचा सल्ला देतात, परंतु त पदार्थ रागदेखील वाढवू शकतात. त्यामुळे मनात राग असताना ते न खाणे चांगले.

**रसाळ फळे**-काकडी आणि टरबूज खाल्ल्याने आपले शरीर हायड्रेट राहते, परंतु राग वाढण्यास तेदेखील कारणीभूत ठरू शकतात. तणावाखाली असाल तर ही रसदार फळे खाऊ नका. दरम्यान, ही माहिती वाचकांसाठी सामान्य माहितीवर आधारित देण्यात आली आहे. प्रत्येकाने आपल्या आहारतज्ञांकडून अधिक माहिती समजावून घ्यावी.

# हर घर तिरंगा अभियानाचा रायगडात जागर

## पेणमधील रॅलीत देशभक्तीचा नारा; आमदार रविशेठ पाटील यांची उपस्थिती

**पेण : प्रतिनिधी**

हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत पेणमध्ये विविध महाविद्यलाये, शाळांच्या वतीने रॅली काढून जनजागृती करण्यात आली. पेण नगर परिषदेच्या वतीने शुक्रवारी (दि. १२) काढण्यात आलेल्या रॅलीत बँड पथकांनी वाजविलेल्या गीतांनी प्रत्येकाच्या मनात देशभक्तीचा स्वर उमटत होता.


(छाया : अनिस मनियार)

या रॅलीमध्ये आमदार रविशेठ पाटील, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, वनअधिकारी पाटकर, माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, माजी नगरसेविका ममता पाटील, युवानेते ललित पाटील, अजय क्षीरसागर हिमांशू कोठारी, विनोद शहा, प्रशासकीय अधिकारी राजाराम नरुटे, शिवाजी चव्हाण, अंकिता इसाळ, माजी नगरसेवक प्रकाश रामाणे यांच्यासह विविध सामाजिक, शासकीय विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही रॅली पेण न. प. मार्गाने गांधी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्गे, कौंडाळ तळे, राजू पोटे मार्ग मार्गे पेण नगर परिषद कार्यालयाच्या प्रागंणात आली. तेथे रॅलीची सांगत करण्यात आली.

## खोपोलीत विद्यार्थ्यांची दौड; पोलीस-पालिकेच्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती

**खोपोली : प्रतिनिधी**

शासनाच्या हर घर तिरंगा या उपक्रमाविषयी नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार आणि जनजागृती करण्यासाठी खोपोलीत शुक्रवार (दि. १२) सकाळी दौडचे आयोजन केले होते. खोपोली नगर परिषद व पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच राजकिय, सामाजिक, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, नागरिक आणि सुमारे सहा हजार विद्यार्थी या दौडमध्ये सहभागी झाले होते.


(छाया : विनायक मांडे)

खोपोलीतील जनता विद्यालयाच्या प्रांगणातून शुक्रवार सकाळी ८वाजता आमदार महेंद्र थोरवे, तहसीलदार आयुब तांबोली यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या दौडचा शुभारंभ झाला. नगर परिषदेचे प्रशासक अनुप दुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला, पोलीस निरीक्षक शिरिष पवार, माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील, माजी नगरसेवक राजू गायकवाड, हरिश काळे, सामाजिक कार्यकर्त्या कांचन जाधव, लायन्स क्लबच्या अध्यक्षा शिल्पा मोदी, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेंद्र जोशी, अपघातग्रस्तचे गुरूनाथ साठेलकर, सहज सेवा फाउंडेशनचे शेखर जांभळे यांच्यासह पोलीस पाटील, टाटा मेमोरियलचे पदाधिकारी, एमजीएम हॉस्पिटलचे आरोग्य कर्मचारी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी या दौडीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी हर घर तिरंगा, भारत माता की जय अशा देशभक्तीपर घोषणा देत शहरातील विविध भागात दौड फिरली.

जनता विद्यालयातून दौडला प्रारंभ करण्यात आले पुढे जैन मंदिर रोड, मुख्य बाजारपेठ, खालची खोपोली, हायको कॉर्नर, गिरनार बिल्डिंग, विणानगर, काटरंग, मोगलवाडी, पंत पाटणकर चौक मार्गे ही दौड भुयारी मार्गाने जनता विद्यालयात आली. तेथे दौडचा समारोप करण्यात आल. दौडच्या माध्यमातून हर घर तिरंगा, स्वच्छता अभियान, माझी वसुंधरा, प्लास्टिक बंदी या उपक्रमाविषयी जनजागृती करण्यात आली.

## कर्जत शहरात प्रभातफेरी

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सव १५ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे, त्यानिमित्ताने राबविण्यात येणाऱ्या हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी कर्जत नगर परिषदेच्या वतीने शहरात शुक्रवारी (दि. १२) प्रभातफेरी काढण्यात आली होती. या वेळी देशभक्तीपर घोषणांनी कर्जत शहर दुमदुमले होते.

नगर परिषद कार्यालयापासून काढण्यात आलेल्या या प्रभात फेरीत नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, तहसीलदार विक्रम देशमुख, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे, नगरसेविका सुवर्णा निलधे, पुष्पा दगडे, मधुरा चंदन, भारती पालकर, डॉ. ज्योती मेंगाळ, विशाखा जिनगरे, नगरसेवक राहुल डाळींबकर, बळवंत घुमरे, संकेत भासे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिपान सोनवणे, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र नातू, उपाध्यक्ष अच्युत कोडगिरे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सतिश श्रीखंडे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत उगले, दिनेश गणेगा, छाया कुलकर्णी आदींसह नगर परिषद कर्मचारी,तसेच अभिनव ज्ञान मंदिर, विद्या विकास मंदिर, इंग्लिश मिडीयम स्कुल, शारदा मंदिर, उर्दू शाळा, शिशु मंदिर आदि शाळांचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या प्रभातफेरीच्या सुरूवातीला अभिनव शाळेचे लेझीम पथक होते, विद्यार्थ्यांच्या हातात तिरंगा झेंडा होता, ही प्रभात फेरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आमराई रस्ता, सुरभी ज्वेलर्स, कर्जत एज्युकेशन स्कूल, महावीर पेठ, रेल्वे स्टेशन, मयुरा हॉटेल, खाटीक आळी, मारुती मंदिर, पाटील आळी, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, कचेरी रोड, आनंदनगर मार्गे पुन्हा नगर परिषद कार्यालयात आली तेथे या प्रभात फेरीचा समारोप करण्यात आला.


(छाया : विजय मांडे)

## मोर्बे ग्रामपंचायतीची रॅली; विद्यार्थ्यांचा सहभाग

**माणगाव : प्रतिनिधी**

घरोघरी तिरंगा मोहिमेविषयी जनजागृती करण्यासाठी माणगाव तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीने इकबालशेठ धनसे, अस्लमभाई राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.११) भव्य रॅली काढली होती. तसेच मोर्बा गावातील शाळांत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिवाय ग्रामपंचायतीतर्फे स्वच्छता अभियान व वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला.

मोर्बा गावात १३ते १५ ऑगस्टदरम्यान हर घर तिरंगा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मोर्बेकर सज्ज झाले आहेत. ग्रामपंचायतीने याबाबत जनजागृती करण्यासाठी गुरुवारी रॅली काढली होती. भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देत रॅली मोर्बा गावात फिरविण्यात आली. या रॅलीत सरपंच शहेनाज हार्णेकर, उपसरपंच हसनमिया बंदरकर, गाव अध्यक्ष नुरुद्दीन जलगावकर, माजी उपसरपंच इकबाल हार्णेकर, ग्रामपंचायत सदस्य झुल्फिकार राऊत, कादीर मनेर, तंटामुक्त गाव अध्यक्ष निजाम फोपलुनकर, ग्रामसेवक नरेश तरडे, शौकत रोहेकर, याकुब चिलवान, कादीर हार्णेकर, तलाठी वैशाली सत्वे,



उमर चिलवान आदिंसह एस. एस. हायस्कूल, मॉर्डन स्कूल, राजिप उर्दू व मराठी शाळांचे विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## नेरळ पोलीस ठाण्याने काढली तिरंगा रॅली


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

हर घर तिरंगा या उपक्रमाविषयी जनजागृती करण्यासाठी नेरळ पोलीस ठाण्यातर्फे शुक्रवारी (दि. १२) तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये नेरळ गावातील सर्व संस्था तसेच शाळांचा सहभाग होता. ही तिरंगा रॅली नेरळ गावातून जनजागृती करीत फिरली.

नेरळ पोलीस ठाण्यापासून या तिरंगा रॅलीची सुरुवात झाली. रॅलीच्या अग्रभागी तिरंगी फुग्यांनी सजवलेली जीप होती. त्या पाठीमागे राष्ट्रध्वजाच्या रंगात सजवलेली पोलीस व्हॅन आणि गणवेशधारी पोलीस होते. रॅली कल्याण–कर्जत राज्यमार्ग, गणेश घाट, ग्रामपंचायत कार्यालय, राजमाता जिजामाता तलाव, कुंभार आळी, जुनी बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबिका हॉटेल मार्ग कल्याण रस्त्याने पोलीस ठाण्यात पोहचली. या रॅलीमध्ये सरपंच उषा पारधी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य तसेच व्यापारी फेडरेशन, पोलीस पाटील, टॅक्सी व रिक्षा संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी, भजनी मंडळे, बुरहानी बँड पथक, लेझिम पथके सहभागी झाली होती. या भव्य रॅलीमुळे नेरळ गाव परिसर तिरंगामय झाला होता.

## रोह्यात विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीच्या वतीने १३ ते १५ ऑगस्टदरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येणार आहे. या संदर्भात जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली होती. विविध वेशभुषा करून, हातात स्वातंत्र्यवीरांचे फोटो घेऊन रोठ बुद्रुक शाळेतील मुले या प्रभात फेरीत सहभागी झाली होती. घरोघरी तिरंगा फडकवू या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करु या, हर घर तिरंगा हमारी पहचान, स्वातंत्र्यविराचा विजय असो, अमर रहे अमर रहे हमारे जवान अमर रहे अशा घोषणा देत ही प्रभात फेरी गावात फिरविण्यात आली.

सरपंच नितिन वारंगे, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, उपसरपंच वेदिका डाके, सदस्या वैभवी भगत, ग्रामसेवक दत्तात्रय सावंत, शाळा कमिटी अध्यक्ष तथा भाजप रोहा तालुका कामगार मोर्चा अध्यक्ष विलास डाके, भाजप महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, राजेश भगत, मुख्याध्यापिका पूजा जाधव, उपशिक्षिका माधवी राठोड, साहिल जोंधळे, सुप्रिया वारंगे, अमृता सांळुखे, रोहिणी गोसावी यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी व ग्रामपंचायत कर्मचारी या प्रभात फेरीत सहभागी झाले होते.


(छाया : जितेंद्र जाधव)

## स्वराज्य भूमी कोकण यात्रेचे अलिबागमध्ये आगमन

**अलिबाग : प्रतिनिधी**

समृद्ध कोकण प्रदेश संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्वराज्य भूमी कोकण यात्रेचे शुक्रवारी (दि. १२) अलिबाग येथे आगमन झाले. सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांनी यात्रेचे स्वागत केले.

अलिबागमधील कान्होजी आंग्रे यांच्या समाधीला अभिवादन करण्यात आले. या वेळी ग्लोबल कोकण, समृद्ध कोकण प्रदेश संघटनेचे सस्थापक अध्यक्ष संजय यादवराव, रघुजीराजे आंग्रे, विजय राणे, धनंजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कोकणातील ऐतिहासिक सर्व प्रमुख गावांना भेट आणि देशाचे नेतृत्व करणाऱ्या कोकणातील व्यक्तीमत्वांना अभिवादन व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समृद्ध कोकण प्रदेश संघटनेने १२ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये स्वराज्य भूमी कोकण यात्रेचे आयोजन केले आहे.

आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या शिरढोण येथील स्मारकाला अभिवादन करुन १२ऑगस्ट रोजी या यात्रेला प्रारंभ झाला. पेण तालुक्यातील गागोदे येथील विनोबा भावे यांच्या गावी ही यात्रा पोहोचली. तेथून पुढे सायंकाळी या यात्रेचे अलिबाग येथे आगमन झाले. अलिबाग नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सभेत रघुजीराजे आंग्रे व संजय



यादवराव यांनी उपस्थितांना कोकणातील नररत्नांची माहिती दिली. त्यानंतर यात्रे श्रीवर्धनच्या दिशेने प्रस्तान केले.

## दहिवली विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दहिवली विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, नाटिका सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, नाटिका सादर केल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक मार्तंड जगदाळे, शिक्षिका संगीता पाटील, मीनाक्षी चव्हाण व शिक्षक सचिन उभारे यांच्या मार्गदर्शनाखाली व नियोजनातून या स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.


(छाया : सलीम शेख)

## खालापुरात वाहतूक कोंडी नित्याची; नागरिक वैतागले

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर गावात जाण्यासाठी असलेल्या एकमेव रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना त्याचा नेहमीच सामना करावा लागत आहे.

तालुक्यातील निंबोडे व वणवे तसेच नडोदे नडोदे वाडी व निंडडोळी येथील ग्रामस्थ खालापूर शहरातील या रस्त्याचा वापर करीत असतात. खालापूर न्यायालयासमोरील रस्त्यावर वाहनांची गर्दी व अस्ताव्यस्त पार्किंग यामुळे होत असलेली वाहतूक कोंडी या गावकऱ्यांच्या संतापाचे कारण ठरत आहे.



खालापूर गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत दिवाणी न्यायालय आहे. न्यायालयीन कामकाजासाठी या ठिकाणी बाहेर गावाहून अनेक नागरिक येतात. ते याच रस्त्याकडेला आपली दुचाकी आणि चारचाकी वाहन उभी करतात त्यामुळे खालापूर गावातील नागरिक व विद्यार्थ्यांना या ठिकाणावरून जा–ये करण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. त्याबाबत भाजप शहर उपाध्यक्ष अतिश खेडेकर व नागरिकांनी नगरपंचायतीकडे सातत्याने आवाज उठवला होता. त्या नंतर नगरपंचायतीने एक पार्किंग रेखा उभारून वाहन आणि नागरिकांना जा–ये करण्यासाठी तोडगा काढला होता. मात्र आता हा मुख्य रस्ता खराब झाल्यामुळे नागरिकांना खराब रस्ता आणि ट्रॅफिक या दुहेरी समस्येला सामोरे जावे लागत आहे.

नगरपंचायत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी या समस्येचे निराकरण करून नागरिकांना लवकरात लवकर त्रासमुक्त करावे, अशी मागणी खालापूरसह चार गावातील नागरिकांनी केली आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000024121**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-41/2022-2023**<br>RFx Re-e-tender for Supply and replacement of 80mm & 100mm Radiator for 50MVA TF at 100kV Thal substation under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 11,44,250/-, EMD amount Rs. 11,443/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **12.08.2022, 18:00 Hrs. to 21.08.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.08.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **22.08.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

## निवडक



### चिमुरड्यांचे रक्षाबंधन उत्साहात

**नवी मुंबई** : पूर्व प्राथमिक विद्यालय विवेकानंद संकुल सानपाडा शाळेत रक्षाबंधन साजरे करण्यात आले. कोरोना महामारीच्या युद्धातील खरे सैनिक म्हणजेच डॉक्टर्स, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांचे ऋण निर्देश व्यक्त करण्यासाठी सानपाडा विभाग मनपा आरोग्यकेंद्राचे डॉ. महेश चव्हाण, डॉ. स्वप्नील कांबळे, डॉ. सिद्धेश गायकवाड, डॉ. मनोज अत्तरदे, जुगर सिंग, कविता ताजवे, जागृती माळी, आरोग्य कर्मचाऱ्यांना शाळेत आमंत्रित करून त्यांना विद्यार्थ्यांनी राखी बांधून एक कृतज्ञता भाव व्यक्त करण्यात आला.



### हर घर तिरंगा अमृत महोत्सव मोहीम

**पनवेल** : इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ क्षेत्रीय केंद्र मुंबई येथे हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात आली आणि ध्वजारोहण करण्यात आले. मोहिमेत इग्नुचे क्षेत्रीय निदेशक डॉ. इ. कृष्णा राव, डॉ. पी नंबोथ्थरीपाद, विजयकुमार एम व इग्नूचे सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. डॉ. राव यांनी हर घर तिरंगा अमृत महोत्सव या मोहिमेचे महत्त्व सांगितले. या अभियानाचा मूळ उद्देश देशातील नागरिकांच्या मनात देशभक्ती जागृत करणे हा आहे. घरी झेंडा फडकवण्यासाठी ध्वजसंहितेचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### कळंबोलीत आज बूस्टर डोस लसीकरण

**पनवेल** : सध्या कोरोनाचा धोका पुन्हा वाढल्याने शनिवारी (दि. १३) सकाळी १०.३० ते १ वाजेपर्यंत मोफत बूस्टर डोस लसीकरण कळंबोली सेक्टर १५ महाराष्ट्र शाळेसमोर पनवेल महानगरपालिकेच्या माजी सभापती प्रमिला रविनाथ पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे सुरू होणार आहे. या शिबिरासाठी भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी व कर्मचारी बूस्टर डोस लसीकरण शिबिरास सहकार्य करणार आहेत. महानगरपालिका हद्दीतील जास्तीत जास्त नागरिकांनी या बूस्टर डोस शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईचा विकास आराखडा जाहीर

## नागरिकांना हरकती, सूचनांसाठी ६० दिवसांची मुदत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेची १९९२साली स्थापना झाली, मात्र आजतागयात नवी मुंबईचा विकास आराखडा तयार केला गेला नव्हता. आता २०१८ साली महासभेत सर्वानुमते मंजूर होऊन शासनाला पाठवलेला व राजकारणात अडकलेल्या विकास आराखड्याला शासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार पालिकेने हरकती व सूचना मागवण्यासाठी हा विकास आराखडा खुला केला आहे.

नवी मुंबई पालिकेच्या स्थापनेपासून पहिली विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम २६(१) अन्वये जनतेच्या सूचना व हरकती मागविण्याकरिता १० ऑगस्ट रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने जनतेच्या काही हरकती, सूचना असल्यास प्रारूप विकास योजनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत द्याव्या लागणार आहेत.



प्रारुप विकास योजनेच्या प्रस्तावामध्ये एकूण ६२५ आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. ही आरक्षणे उद्यान, खेळाचे मैदान, विविध शैक्षणिक, सामाजिक सुविधा, मार्केट आदी सुविधांकरिता प्रस्तावित आहेत. नियोजनाच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या ठिकाणी मिसिंग लिंक, सर्व्हिस रोड, रस्ते रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सिडको विकसित इमारतींच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने या पुनर्विकासाला चालना मिळावी याकरिता सिडको विकसित कंडोमिनियमच्या लगत रस्त्यांचे आवश्यक त्या ठिकाणी रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

नवी मुंबई पालिकेच्या परिवहन उपक्रमाकरिता विविध ठिकाणी आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

### महापालिकेची प्रस्तावित विकासकामे

*नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीलगत खाडीकिनारी सागरी रस्ता, घणसोली सेक्टर १२ व १३ येथे भव्य आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलाकरिता साधारणत: ७५ एकर क्षेत्रावर आरक्षण, वाशी सेक्टर १९ ए मध्ये म्युझियमकरिता आरक्षण, ऐरोली सेक्टर १०एमध्ये सुमारे लेझर पार्क, बोटॅनिकल गार्डन व रिसर्च सेंटरकरिता आरक्षण, सानपाडा येथे सेंट्रल लायब्ररीकरिता भूखंड आरक्षित, शहरात पार्कींगकरिता १२५ प्लॉट्स आरक्षित, शक्य आहे त्या ठिकाणी नागरिकांकरिता सायकल ट्रॅक प्रस्तावित करण्यात आले आहेत.*

**एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार उपलब्ध होणारे अतिरिक्त चटई क्षेत्र लक्षात घेता, येत्या काही वर्षांमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. या विकासामुळे नागरी सुविधांवरील ताण वाढणार आहे. या नागरी सुविधांचा वाढत्या लोकसंख्येला आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यासाठी प्रस्तावित आरक्षणे निश्चित उपयुक्त ठरतील.**
**-अभिजीत बांगर, आयुक्त,**
**नवी मुंबई महापालिका**

## ऐरोलीत सायकल रॅलीद्वारे घरोघरी तिरंगा अभियानाचा प्रचार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका ऐरोली विभाग कार्यालयाच्या वतीने निर्धार फाउंडेशन यांच्या सहयोगाने भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सेक्टर १९ ऐरोली येथील नेवा गार्डनपासून सेक्टर १५ ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापर्यंत ही सायकल रॅली अतिशय उत्साहात झाली.



यामध्ये २००हून अधिक सायकलस्वारांनी सहभागी होत ही रॅली यशस्वी केली. ऐरोली विभागाचे विभाग अधिकारी महेंद्र सप्रे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीमध्ये माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी नगरसेवक अशोक पाटील, अंकुश सोनवणे यांच्यासह अनेक सायकलपटूंनी उस्फूर्त सहभाग घेतला. रेल्वे अपघातात आपले पाय गमावलेल्या रमेश शुक्ला या दिव्यांग जिद्दी सायकलपटूनेही या सायकल रॅलीत सहभागी होत सर्वांचा उत्साह वाढवला.

## एमआयडीसी कामगारांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**



औद्योगिक क्षेत्रात घडणाऱ्या छोट्या-मोठ्या अपघातांना प्रतिबंध बसावा यासाठी नागरी संरक्षण दल व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने औद्योगिक कामगारांसाठी तीन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण घेण्यात आले. ठाणे व बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील उद्योग क्षेत्रातील कामगार तसेच कर्मचारी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.

राज्य मिशन २०२२-२०२३अंतर्गत संचालक, नागरी संरक्षण यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी संरक्षण दलाच्या वतीने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण रबाळे अग्निशमन केंद्र येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे ३ ते ५ ऑगस्ट दरम्यान प्रशिक्षण पार पडले. देशाच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यवर्षात औद्योगिक जडणघडणीमध्ये व प्रतिबंधक उपाययोजनांद्वारे प्रशिक्षित कामगार वर्ग तयार करण्याकरिता नागरी संरक्षण दलाच्या वतीने हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात प्रामुख्याने आग प्रतिबंध व सुरक्षा उपाययोजना, प्रथमोपचार व सीपीआर, विमोचन या विषयावर व्याख्याने व प्रात्यक्षिके पार पडली.

नागरी संरक्षण विभागातर्फे सुरक्षा उपाययोजनाकरिता जास्तीत जास्त औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. या कार्यक्रमासाठी नागरी संरक्षण संचालनालय तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पनवेल : हर घर तिरंगा अभियानासाठी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा नातू श्रीयांश निलेश भगत सज्ज झाला आहे.

## नवी मुंबईत विविध ठिकाणी जनजागृती रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जनजागृतीपर रॅलीचे आयोजन नवी मुंबई मनपा तुर्भे विभाग कार्यालयाच्या वतीने सहा. आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. यामध्ये कोपरीगाव परिसर आणि एपीएमसी मार्केट परिसरात नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांसह स्वामी विवेकानंद शाळेच्या विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत जनजागृती केली.





त्याचप्रमाणे जयपुरिया स्कूलच्या २००हून अधिक विद्यार्थ्यांनी सानपाडा भागात रॅली काढून सानपाडा परिसरातील नागरिकांना घरोघरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन केले. दिघा विभागातही नागरिकांमध्ये घरोघरी तिरंगा या उपक्रमाच्या संदेश प्रसारणाकरिता विभाग अधिकारी मनोहर गांगुर्डे यांच्या माध्यमातून जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई महानगरपालिका दिघा शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांसह दिघा विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घरोघरी तिरंगा उपक्रमाचा दिघा परिसरात व्यापक प्रचार केला.

## पडघे गावात भाजपतर्फे झेंडावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वतंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्त शुक्रवारी (दि. १२) पनवेल मनपा वार्ड क्र. २मधील पडघे गावातील राजिप शाळेत भाजपच्या माध्यमातून तिरंगा झेंडावाटप करण्यात आले.

या वेळी सरपंच कृष्णाशेठ पाटील, गजानन पाटील, दिलीप भोईर, पांडुरंग भोईर, नामदेव भोईर, के. टी. भोईर, प्रकाश भोईर, यशवंत भोईर, चंद्रकांत भोईर, रोहिदास जोशी, कृष्णा जोशी, त्रिंबक पाठे, अंकुश भोईर, गुरुनाथ भोईर, रघुनाथ भोईर, प्रल्हाद भोईर, पवन भोईर, आशीष कडू, अमित पाटील, कुणाल पाटील, दीपक पाटील, बालू खुटारकर, संतोष पाटील, बलिराम पाटील, माया भोईर, किशोर पाटील, सचिन पाटील व ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.



## नवी मुंबईत ठिकठिकाणी नारळीपौर्णिमेचा उत्साह

**नवी मुंबई : बातमीदार**

नारळी पौर्णिमेच्या दिवशी सागराला सोन्याचा नारळ अर्पण केल्यानंतर कोळी बांधव मासेमारीला सुरुवात करतात. त्यामुळे किनारी भागातील संस्कृतीच्या महत्त्वाच्या अशा या सणाला नवी मुंबईतील कोळीवाड्यांत गुरुवारी (दि. ११) मोठा उत्साह पाहायला मिळाला. सरसोळे जेट्टी, दिवाळे, ऐरोली, दिवा कोळीवाडा, वाशी खाडीकिनारा, घणसोली कोळीवाडा, बेलापूर गावासह समस्त कोळीवाड्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण होते.

दिवाळे, सारसोळे कोळीवाडा येथून पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. पालखीत सोन्याचा नारळ ठेवून वाजतगाजत पालखी खाडीच्या दिशेने रवाना झाली. कोळी बांधव आपल्या पारंपरिक वेशभूषेत या मिरवणुकीत सहभागी झाले होते. महिलांचे पारंपरिक पेहराव, दागिने सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या वेळी आगरी कोळी समाजात प्रसिद्ध असेलेल्या ब्रास बँड पथकाने आपली पारंपरिक गिते वाजवात सोहळ्यात लज्जत आणली होती. पारंपरिक संगीताच्या तालावर महिला, महिला, मुलांनी ठेका धरला.

सणासाठी खाडीजवळील जेट्टीच्या परिसराची साफसफाई करण्यात आल्याने जेट्टीला नवीन रूप आले होते. गुरुवारू दुपारी नारळाची विधिवत पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करण्यात आला. कोळी समाजातील पुरुष, महिला आणि लहान मुले पारंपरिक वेशामध्ये या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते. सरसोळे, वाशी, दिवाळे, शिरवणे, दिवा, घणसोली ऐरोली या ठिकाणी ही मिरवणूक काढण्यात आली होती.

सरसोळेच्या नारळी पोर्णिमेला नवी मुंबईतील सर्वपक्षीय नेत्यांनी हजेरी लावली. नेत्यांनीदेखील कोळी समाजाची पारंपरिक टोपी परिधान केली होती. काहींनी ब्रास बँड पथकाच्या तालावर ठेकादेखील धरला.







## सैनिकी शाळेत क्रांती, आदिवासी दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिखले येथील सैनिकी शाळा विजय आर्मी स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे क्रांतीदिन तसेच जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी नृत्य व गीत गायन सादर केले. या वेळी प्राचार्य एम. के. मराठे हे अध्यक्षस्थानी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सैनिक निर्देशक पी. एस. पाटील व एस. टी. पाटील उपास्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन तसेच बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर हर घर तिरंगा व स्वातंत्र्याच्या ७५वा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने माजी सैनिकाचा सत्कार करण्यात आला.

या वेळी उप प्राचार्य एस. पी. पाटील, पर्यवेक्षक एस. एस. बिहाडे, पर्यवेक्षक ए. डी. अहिरे, व्ही. जे. साळुंखे व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ठाकरे यांनी केले, तर प्रास्ताविक डी. टी. पाटील यांनी केले व उपस्थितांचे आभार आरती मोरे यांनी मानले.

राम प्रहर
श्रावणधारा

### असा हा पाऊस..

भरल्या आभाळातून बरसती धारा
एकेका ढगास लोटतो बेभान वारा
थेंबाथेंबानी होतं मातीचं लोणी
फांदीवरी पाखरं गाती गोड गाणी

कडाडते वीज धडकी भरते उरात
नदी नाले घेऊनी गंगा येई दारात
मातीच्या गर्भातुनी अंकुर फुलतो
हिरवा शालू नेसुनी शिवार झुलतो

डोंगरमाथ्याला निळे निळे झरे फुटले
गेला सरूनी दुष्काळ सृष्टीचे कोडे सुटले
या पावसाला साऱ्या चराचराचं भान
मातीतल्या दाण्याला भुकेल्याची जाण

हा पाऊस कधी कधी वैरीही वाटतो
सुखी संसाराच्या उगी जीवावर उठतो
तरी साऱ्या विश्वाचा हाच जीवनदाता
पामर मानोनी तुझ्यापुढे टेकितो माथा!



-सुभाष कुडके,
नवीन पनवेल

# माणगावमधील वाहतूक कोंडी सुटणार

## गणेशोत्सवासाठी पोलीस सज्ज, बाजारपेठेतील रस्त्याची केली पाहणी

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात माणगावातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी पोलीस यंत्रणा आणि नगरपंचायत प्रशासन सतर्क झाली असून, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व वाहतूक पोलिसांनी उपाययोजना करण्यासाठी बाजारपेठेतील रस्त्याची पाहणी केली व संबंधितांना आवश्यकत्या सूचना केल्या.


(छाया : सलीम शेख)

मुंबई-गोवा महामार्गाच्या दुतर्फा माणगाव बाजारपेठ आहे. या बाजारपेठेत खरेदीसाठी नेहमी ग्राहकांची गर्दी असते. महामार्गालगत माणगाव एसटी बस स्थानक आहे. तेथे वाहने व प्रवाशांची वर्दळ असते. त्याचा परिणाम महामार्गावरील वाहतूकीवर होतो. विशेषत: गणेशोत्सवाच्या काळात माणगाव परिसरात कायम वाहतूक कोंडी होते. गणेशोत्सवासाठी मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, कल्याण परिसरातील चाकरमानी मोठ्या प्रमाणात कोकण व तळ कोकणात येत असतात. त्यांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर व्हावा व माणगाव बाजारपेठेत वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, निरीक्षक राजेंद्र पाटील व कर्मचारी तसेच नगरपंचायतीचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, नगराध्यक्ष, वाहतूक पोलीस या सर्वांनी एकत्रितपणे माणगाव बाजारपेठेतील रस्त्याची पाहणी करून उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.

माणगाव बाजारपेठेमध्ये बॅरिकेट्स लावून वाहतूक सुरळीत ठेवण्या येणार आहे. महामार्ग तसेच पर्यायी मार्गावर जागोजागी दिशा दर्शक फलक लावण्यात येणार आहेत. बाजारपेठेत १० ते १५ वाहतूक पोलीस व प्रत्येक पॉइंटला २० ते २५ पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. गणेशोत्सवात बाजारपेठेत खरेदी करण्यास येणाऱ्या तसेच मुंबई-गोवा महामार्गाने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. मुंबई बाजूकडून येणाऱ्या एसटी बससाठी एमआरएफ टायर शोरूमसमोर स्टॉप तयार करण्यात आला आहे. तसेच बाजारपेठेतील रिक्षा थांब्यावर एकावेळी एकच रिक्षा उभी करावी, महामार्गालगत असलेल्या हातगाड्या हटवाव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या काळात बाजारपेठेत अनधिकृत पार्किंग केल्यास वाहन चालकावर पोलिसांची कारवाई केली जाणार आहे. कचेरी रोड, मोर्बा रोड, निजामपूर रोड, व महामार्गावरील मुख्य बाजारपेठेत फुटपाथवरून जाणाऱ्या येणाऱ्या पादचाऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी फेरीवाले, हातगाडे व्यावसायिकांनी घ्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

# कृत्रिम हात-पाय, श्रवणयंत्र, व्हीलचेअर नि:शुल्क होणार उपलब्ध

## सहज सेवा फाउंडेशनचा उपक्रम

खालापूर : प्रतिनिधी

सहज सेवा फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या खोपोली येथील जनसंपर्क कार्यालयात बुधवारी (दि. १०) खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते बॅटरीवर चालणारा कृत्रिम हात, पाय तसेच श्रवणयंत्र, अपंगांसाठी व्हीलचेअर नि:शुल्क तत्वावर उपलब्ध करुन देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमातून ज्यांना मदत मिळणार आहे, त्यांच्या आयुष्यामध्ये एक वेगळीच ऊर्जा येऊन त्यांचा आत्मविश्वास वाढेल, असा विश्वास व्यक्त करून तहसीलदार आयुब तांबोळी यांनी या उपक्रमासाठी सढळ हाताने आर्थिक भार उचलणाऱ्या पंकज शर्मा यांचे कौतुक केले.

या उपक्रमाचे पुरस्कर्ते पंकज शर्मा, उपक्रम प्रमुख दिवेश राठोड, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे, माजी उपनगराध्यक्ष अरुण पुरी, माजी नगरसेवक किशोर पानसरे, माजी नगरसेविका केविना गायकवाड, वैशाली जाधव, सामाजिक कार्यकर्ते नवीन घाटवळ, सुवर्णा मोरे, शैलेश विठ्लानी, सुरेख खेडेकर, शिल्पा सुर्वे, अनिल सानप, राकेश मिरवणकर, दिलीप पवार, हनुमान मोरे, राहुल जाधव, प्रसाद वाडकर, ॲड. स्नेहराज ओसवाल, राकेश मिरवणकर, इरफान शेख, डॉ. रक्षा मोलडे, आरती मोरे, नम्रता परदेशी, रंजन चौधरी, सुजित महाडिक, अय्याज शेख, अब्दुल्ला कर्जीकर यांच्यासह रुग्ण या वेळी उपस्थित होते.

फाउंडेशनचे मार्गदर्शक राजेंद्र फक्के यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, महिला संघटक नीलम पाटील, खालापूर तालुका प्रमुख तौफिक कर्जीकर, मोहन केदार, मनोज रुपवते, अजय कांबळे, अजय उमाळे, ॲड. स्नेहल गुरव, राकेश ओसवाल, प्रथमेश पाटील यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.


(छाया : अरूण नलावडे)

# रायगड जिल्ह्यात रक्षाबंधन उत्साहात; बहीण-भावाचे नाते वृद्धिंगत

## खोपोली भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांना बांधल्या राख्या

**खोपोली : प्रतिनिधी**

रक्षाबंधन सणाच्या पूर्वसंध्येला भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यात जाऊन तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन उत्सव साजरा केला.

पोलीस कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना आपल्या घरी जाऊन उत्सव साजरा करता येत नाही, या पार्श्वभूमीवर बुधवारी भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यात जाऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधल्या. पोलीस कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले.

भाजप महिला मोर्चाच्या खोपोली शहर अध्यक्षा शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, जिल्हा कोषाध्यक्ष रसिका शेटे, शहर कोषाध्यक्ष विमल गुप्ते, उपाध्यक्ष अपर्णा साठे, ज्येष्ठ कार्यकर्त्या स्नेहल सावंत, गीता मोहिते, निशा दळवी, सुमिती महर्षी यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्या या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर या महिला कार्यकर्त्यांनी माजी सैनिक युद्धवीर प्रकाश महाडिक यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांनाही राखी बांधली.




(छाया : विजय मांडे)

## शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांचे रक्षाबंधन

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील शारदा मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी गुरूवारी (दि. ११) कोरोना योद्ध्यांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

कोरोना महामारीत सर्व बंद होते, मात्र आरोग्य व पोलीस यंत्रणा तसेच नगर परिषद सफाई कर्मचारी फ्रंट लाईनवर जीवाची बाजी लावून काम करत होते. अशा योद्ध्यांना गुरूवारी शारदा मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे, छाया नगरकर, धनश्री कानडे, अस्मिता ठाणगे आदी शिक्षक व विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या.

## सोगाव येथील विद्यार्थिनींनी डॉ. किरण पाटील यांना बांधली राखी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून अलिबाग तालुक्यातील एसओएस चिल्ड्रन व्हिलेज सोगाव संस्थेतील विद्यार्थिनींनी गुरुवारी (दि. ११) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना राख्या बांधल्या. या वेळी डॉ. किरण पाटील यांनी विद्यार्थिनींसोबत मनमोकळा संवाद साधून, त्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.



एसओएस चिल्ड्रन व्हिलेज सोगाव व रूरल ॲण्ड यंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. एसओएस चिल्ड्रन व्हिलेज सोगाव येथील सरस्वती जाधव, तनिष्का कोळी, वैशाली नाईक, मंजुषा वाघमारे, श्रावणी गायकवाड, मनीषा गुप्ता या विद्यार्थिनींनी डॉ. किरण पाटील यांना राखी बांधली. संस्थेच्या समाजसेविका प्रेमलता तंगराज, कविता पवार, फाउंडेशन संस्थापक सुशील साईकर उपस्थित होते.

## वांगणीतील विद्यार्थ्यांकडून ‘वृक्षाबंधन’; झाडे संवर्धनाची शपथ



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या वांगणी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील वृक्षांना राख्या बांधून रक्षाबंधन सण अनोख्या पद्धतीने साजरा केला. या वेळी विद्यार्थ्यांनी वृक्षांचे रक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेतली.

हायस्कूलचे हरितसेना प्रमुख टिळक खाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे रोहा सामाजिक वनीकरण विभागाचे वनक्षेत्रपाल आशिष पाटील, वनपाल दिलीप वाघे, शंकर कराडे, वनरक्षक धिरेश थळकर, नंदिनी कडव, शाळेचे मुख्याध्यापक जयहिंद ठाकूर यांनी कौतुक केले.

वांगणी, बाळसई, आमडोशी, गोडसई, पाटणसई, उनाठावाडी या गावात प्रत्येकी ७५झाडे लावण्याचा संकल्प या वेळी वांगणी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी केला. टिळक खाडे यांनी या वेळी वृक्षांचे महत्त्व विशद केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


(छाया : धम्मशील सावंत)

## चाफेवाडी आश्रमशाळेकडून सीमेवरील जवानांना राख्या




(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

आदिवासी विकास विभाग-ठाणे आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प-पेण अंतर्गत येत असलेल्या कर्जत तालुक्यातील चाफेवाडी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी राख्या तयार करून त्या देशाच्या सीमेवर असलेल्या आपल्या जवानांना पाठविल्या.

आझादी का अमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या मार्गदर्शनानुसार आश्रमशाळा मध्ये विविध उपक्रम राबविले गेला.

सांस्कृतिक विभागामार्फत ‘एक राखी सैनिकांसाठी, सीमेवरच्या जवानांसाठी’ या उपक्रमाअंतर्गत चाफेवाडी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या ४०६ विद्यार्थ्यांनी २६जुलैपासून काही टाकाऊ वस्तू, काही निरुपयोगी साहित्य आणि सुशोभित करणारे साहित्य यापासून स्वतःच्या कल्पकतेने अत्यंत आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्या आणि पाच शुभेच्छा पत्रे चाफेवाडी आश्रमशाळेने आसाम रायफल युनिट मेघालय येथे कार्यरत सैनिकांना पाठविल्या. त्यासाठी मुख्याध्यापक एम. पी. पाटील, अधीक्षक एस. पी. पाटील, क्षीरसागर भुसे, राजेश शिंदे, जी. एस. पाटील, ज्ञानेश्वर शिंदे आदिंनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## माणगावात रिक्षा संघटनेतर्फे नारळीपौर्णिमा उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुका रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे गुरुवारी (दि.११) नारळीपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. माणगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिष आस्वर यांच्या हस्ते नारळाची पूजा करण्यात आली. या नारळाची वाजत, गाजत, बाजारपेठ ते काळ नदी अशी मिरवणूक काढण्यात आले. सायंकाळी नदीत नारळाचे विसर्जन करण्यात आले.



संघटनेचे संजयआण्णा साबळे, उपाध्यक्ष जमाल पिलपिले, लियाकत रहाटविलकर, सल्लागार नरेश सावंत, हुसेन आकुस, पांडुरंग गुजर, पोलीस शिपाई रामनाथ डोईफोडे, शाम शिंदे, भाऊ पांडे, संतोष सावंत, यांच्यासह सर्व रिक्षा चालक, मालक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरूडमधील कोळी समाजाचा नारळ दर्याला अर्पण

**मुरुड : प्रतिनिधी**

शहरातील नवापाडा कोळीवाडा परिसरातील कोळी बांधवांनी गुरुवारी (दि. ११) ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढून सजवलेला मानाचा नारळ समुद्राला अर्पण केला.

नारळी पौर्णिमेच्या दिवशी दर्याला नारळ अर्पण केल्यावर समुद्र शांत होतो. मासेमारी व्यवसायाला बरकत येते, अशी कोळी समाज बांधवांची श्रध्दा आहे. त्यानुसार मुरुड नवापाडा कोळीवाडा परिसरातील कोळी बांधवांनी गुरुवारी पारंपरिक वेशभूषा करून मानाच्या नारळाची वाजतगाजत मिरवणूक काढली होती. नवापाडा कोळी समाज अध्यक्ष यशवंत सवाई, उपाध्यक्ष ऋषिकेश बैले, सुरेंद्र मकु, मनोहर मकु, मनोहर बैले यांच्यासह कोळी बंधू, भगिनी या मिरवणूकीत सहभागी झाले होते. समुद्र किनारी या मानाच्या नारळाची विधिवत पूजा करून नारळ दर्याला अर्पण करण्यात आला.


(छाया : संजय करडे)

## सुपर चषक फुटबॉल स्पर्धा

# रेयाल माद्रिदचा विजेतेपदाचा ‘पंच’

**हेलसिंकी : वृत्तसंस्था**

स्पॅनिश संघ रेयाल माद्रिदने जर्मन संघ एनट्रॅक फ्रँकफर्टवर २-० अशी मात करीत युएफा सुपर चषक फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रेयालकडून डेव्हिड अलाबा आणि कर्णधार करीम बेन्झिमा यांनी गोल केले. रेयालला यंदा पाचव्यांदा सुपर चषकावर नाव कोरण्यात यश आले.



फिनलंडची राजधानी हेलसिंकी येथे झालेल्या अंतिम सामन्यात गेल्या हंगामातील चॅम्पियन्स लीग विजेत्या माद्रिदने सुरुवातीपासून युरोपा लीग विजेत्या फ्रँकफर्टवर वर्चस्व गाजविले. ३७व्या मिनिटाला माद्रिदच्या व्हिनिसियसने मारलेला फटका फ्रँकफर्टचा गोलरक्षक केव्हिन ट्रॅपने अडवला, पण माद्रिदला कॉर्नर किक मिळाली. यावर बेन्झिमा आणि कॅसेमिरोच्या सहाय्याने अलाबाने गोल करीत माद्रिदला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर बेन्झिमा आणि व्हिनिसियस यांनी पुन्हा गोलचे प्रयत्न केले, मात्र ट्रॅपला चेंडू गोलजाळ्यात जाण्यापासून रोखण्यात यश आले.

६५व्या मिनिटाला व्हिनिसियसच्या पासवर बेन्झिमाने केलेल्या गोलमुळे माद्रिदला २-० अशी आघाडी मिळाली. बेन्झिमाचा हा माद्रिदसाठी ३२४वा गोल ठरला. त्यामुळे त्याने माजी कर्णधार आणि आघाडीपटू राउलला मागे टाकत माद्रिदसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे. माद्रिदचे प्रतिनिधित्व करताना केवळ ख्रिस्टियानो रोनाल्डोने (४५०) बेन्झिमापेक्षा अधिक गोल केले आहेत. माद्रिदने दोन गोलची आघाडी घेतल्यानंतर फ्रँकफर्टने आक्रमणाची गती वाढवली, मात्र त्यांना माद्रिदचा बचाव भेदण्यात अपयश आले.

यासोबतच रेयाल माद्रिदने पाचव्यांदा सुपर चषक जिंकून बार्सिलोना आणि एसी मिलान यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. या तिन्ही संघांनी प्रत्येकी पाच वेळा सुपर चषक पटकाविला आहे. माद्रिदने यापूर्वी २००२, २०१४, २०१६ आणि २०१७मध्ये हा चषक जिंकला होता.

# झिम्बाब्वे दौऱ्यासाठी के. एल. राहुलकडे नेतृत्व

## तंदुरुस्त झाल्याने भारतीय संघात निवड; धवन उपकर्णधार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



अनुभवी फलंदाज केएल राहुलला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वैद्यकीय पथकाने तंदुरुस्त जाहीर केल्यानंतर आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी त्याची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. झिम्बाब्वेमध्ये होणाऱ्या तीन सामन्यांच्या (१८, २०, २२ ऑगस्ट) एकदिवसीय मालिकेसाठी आधी डावखुरा सलामीवीर शिखर धवनकडे भारतीय संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले होते, पण आता राहुलकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आल्याने धवन उपकर्णधारपद सांभाळेल.

राहुल मे महिन्यात झालेल्या आयपीएलनंतर एकही सामना खेळलेला नाही. त्याला सुरुवातीला दुखापतीमुळे मैदानाबाहेर राहावे लागले होते आणि त्याच्यावर शस्त्रक्रियाही झाली. त्यातून सावरल्यानंतर तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत खेळणार होता, परंतु त्यापूर्वी त्याला कोरोनाची बाधा झाल्याने त्याचे पुनरागमन लांबणीवर पडले. राहुलला कोरोनातून सावरण्यासाठी बराच वेळ लागत असल्याने त्याची झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघात निवडही झाली नव्हती, मात्र आता राहुलने निवडीसाठी आवश्यक तंदुरुस्तीचे सर्व निकष पूर्ण केल्याचे बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाकडून सांगण्यात आले आहे.

दुसरीकडडशे नियमित कर्णधार क्रेग एर्व्हाइन पायाच्या दुखापतीमुळे भारताविरुद्ध एकदिवसीय मालिकेसाठी मुकणार असून यष्टीरक्षक-फलंदाज रेगिस चकब्वा झिम्बाब्वेचे नेतृत्व करेल.

**झिम्बाब्वे संघ** : रेगिस चकाब्वा (कर्णधार), रायन बर्ल, तनाका चिवांगा, ब्रॅडली इव्हन्स, ल्यूक जोंगवे, इनोसंट काया, टी. कैटानो, क्लाइव्ह मडांडे, वेस्ली मधेवेरे, तादिवानाशे मारुमनी, जॉन मसारा, टोनी मुन्योंगा, रिचर्ड एन्गरावा, व्हिक्टर एनयाउची, सिकंदर रझा, मिल्टन शुम्बा, डोनाल्ड टिरिपानो.

**भारतीय संघ :** केएल राहुल (कर्णधार), शिखर धवन (उपकर्णधार), ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल, दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, इशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दूल ठाकूर, कुलदीप यादव, अक्षर पटेल, आवेश खान, प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, दीपक चहर.

# रशीद, रबाडा खेळणार ‘मुंबई इंडियन्स‘च्या संघातून



**मुंबई : प्रतिनिधी**

विख्यात लेगस्पीनर रशीद खान, वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा, सॅम करन आणि लिएम लिव्हिंगस्टोन आयपीएलमध्ये विविध संघांतून खेळत असले तरी ते मुंबई इंडियन्स संघाचे सदस्य झाले आहेत. दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये मुंबई इंडियन्स फ्रँचाईजी असून त्यांचा एमआय केपटाऊन हा संघ आहे आणि त्या संघात हे खेळाडू असणार आहेत.

द. आफ्रिकेतील या लीगमध्ये खेळणाऱ्या सहाही संघांची मालकी आयपीएलमधील विविध संघ मालकांची आहे. लीगच्या नियमानुसार यातील तीन खेळाडू परदेशी, एक आफ्रिकेचा आंतरराष्ट्रीय खेळाडू; तर एक आफ्रिकेतील नवोदित खेळाडू असणे आवश्यक आहे. त्यानुसार एमआय केपटाऊन संघाने आपले पहिले पाच खेळाडू निवडले आहेत. यात रशीद खान, लिव्हिंगस्टोन आणि सॅम करन हे परदेशी खेळाडू असून रबाडा हा आफ्रिकेचा आंतरराष्ट्रीय खेळाडू, तर डेवाल्ड ब्रेविस हा नवोदित खेळाडू आहे.

# रेवदंड्यात रंगली नारळ फोडी स्पर्धा

## विलास धाटावकरांचा संघ विजेतेपदाचा मानकरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नारळीपौर्णिमेच्या निमित्ताने रेवदंड्यातील साई नगर पटांगणात रेवदंडा-चौल ग्रामस्थ आयोजित नारळ फोडी स्पर्धेत विलास धाटावकर यांचा संघ विजेता ठरला. त्यांना कै. संजय म्हात्रे स्मृतिचषक व रोख रकमेचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



या स्पर्धेचा शुभारंभ प्रफुल्ल मोरे व औदुंबर गोंधळी यांच्या हस्ते करण्यात आला. स्पर्धेत एकूण तीन गटांमध्ये २४ संघांना प्रवेश देण्यात आला होता. अंतिम लढत विलास धाटावकर व संदेश गायकर यांच्या संघांत झाली. यात धाटवकर संघाने दोन नारळ शिल्लक राखून गायकर यांच्यावर विजय मिळविला.

द्वितीय क्रमांकाचा कल्पना नाईक स्मृतिचषक संदेश गायकर, तृतीय क्रमांकाचा चषक विशाल कवळे आणि चतुर्थ क्रमांकाचा चषक मायरा म्हात्रे यांनी पटकाविला. शिस्तबद्ध संघ ओम नाईक, उत्कृष्ट मारेकरी तुषार धाटावकर, नवोदित मारेकरी देवांग सुडकू, जास्त नारळ फोड्या विशाल कवळे यांनाही बक्षीस देण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभास सुरेंद्र म्हात्रे, आशिष भट, रेवदंडा ग्रामपंचायतीचे सदस्य संदीप खोत, स्पर्धेचे आयोजक सुहास घोणे, अध्यक्ष संदेश बेडेकर, आनंद म्हात्रे, रमेश वार्डे, राजू नाईक, प्रमोद म्हात्रे, भारत वाडेकर, दिपेश पाटील, मुनाफ गोंडेकर उपस्थित होते. स्पर्धे दरम्यान नारायण मुंबईकर, सलीम तांडेल आदींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत पंचाचे काम अजित पाटील, अरूण नाईक, मुनाफ गोंडेकर, जयंत नाईक आणि गुणलेखक म्हणून मंगेश मढवी यांनी काम पाहिले.

# अर्जुन तेंडुलकर गोव्याकडून खेळणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

महान माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन पुढील देशांतर्गत क्रिकेट हंगामात गोव्याकडून खेळण्याची शक्यता आहे. अर्जुनने मुंबई क्रिकेट संघटनेकडून (एमसीए) ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केला आहे.

२२ वर्षीय डावखुरा वेगवान गोलंदाज अर्जुन २०२०-२१च्या क्रिकेट हंगामातील सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेत मुंबईकडून हरियाणा आणि पुद्दुचेरी संघांविरुद्धच्या दोन सामन्यांत खेळला होता. अर्जुनला अधिकाधिक सामने

### ना हरकत प्रमाणपत्रासाठी ‘एमसीए’कडे केला अर्ज



मिळणे आवश्यक आहे, असे एसआरटी स्पोर्ट्स मॅनेजमेंटने म्हटले आहे.

तीन हंगामांआधी अर्जुन श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांत भारताच्या १९ वर्षांखालील संघाकडून खेळला होता. गेल्या हंगामात त्याला मुंबई संघातून वगळण्यात आले होते.

# अपयशावर विराट मात करेल -जयवर्धने

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताचा आघाडीचा फलंदाज विराट कोहली सध्या खराब फॉर्ममध्ये आहे. यावर बोलताना श्रीलंकेचा माजी कर्णधार माहेला जयवर्धनेने विराटकडे अपयशावर मात करण्याची क्षमता असून तो लवकरच यातून बाहेर पडेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.



आशिया चषक क्रिकेट स्पर्धेसाठी विराट आणि लोकेश राहुल यांचे भारतीय संघात पुनरागमन झाले आहे. विराट कारकीर्दीत प्रथमच कठीण कालखंडातून जात आहे. त्याने नोव्हेंबर २०१९पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर एकही शतक झळकावलेले नाही. भारतीय संघाच्या अलीकडेच झालेल्या इंग्लंड दौऱ्यातही विराट सहा डावांत केवळ ७६ धावाच करू शकला होता. त्यानंतर झालेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या आणि आगामी झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेतूनही त्याला वगळण्यात आले.

या पार्श्वभूमीवर बोलताना जयवर्धने म्हणाला की, विराटच्या बाबतीत सध्या जे काही होत आहे ते दुर्दैवी आहे, पण तो गुणी खेळाडू आहे. त्याच्या खेळात दर्जा आहे. अपयश तेवढ्यापुरतेच असते. त्याला जास्तीत जास्त सामने खेळायला मिळण्याची आणि त्याने खेळपट्टीवर अधिक काळ टिकून राहण्याची गरज आहे.

केएल राहुल आयपीएलनंतर फार क्रिकेट खेळलेला नाही. त्यामुळे तो आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत कितपत प्रभावी ठरू शकेल, अशी शंका जयवर्धनेने उपस्थित केली आहे.

भारताने सलामीसाठी डावखुऱ्या फलंदाजांचा विचार करण्याची गरज असून यासाठी ऋषभ पंत हा उत्तम पर्याय असेल. भारताने त्याला सलामीला खेळवण्याचा विचार करावा, असेही जयवर्धनेने म्हटले.

# ‘राष्ट्रकुल’ पदकविजेत्या श्रीशंकरकडून डायमंड लीग ॲटलेटिक्समध्ये निराशा



**मोनॅको : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेता लांब उडीपटू मुरली श्रीशंकरला पदार्पणीय डायमंड लीग ॲथलेटिक्समध्ये सहावा क्रमांक मिळवत निराशा केली. ७.९४ मीटर ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली.

सहा दिवसांपूर्वी बर्मिंगहॅम येथे ऐतिहासिक रौप्यपदक पटकावणाऱ्या श्रीशंकरकडून डायमंड लीग स्पर्धेत दिमाखदार कामगिरीची अपेक्षा केली जात होती. जोरदार वाऱ्यांचा पहिल्या फेरीतील खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम जाणवला. २३ वर्षीय श्रीशंकरने ‘राष्ट्रकुल’मध्ये ८.०८ मीटर अशी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली होती. याचप्रमाणे चालू हंगामात ८.३६ मीटर अशी वैयक्तिक कामगिरीसुद्धा त्याच्या खात्यावर आहे. युजेन येथे गेल्या महिन्यात झालेल्या जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत ७.९६ मीटर अशी सर्वोत्तम कामगिरी नोंदवत श्रीशंकरने सातवा क्रमांक मिळवला होता, मात्र डायमंड लीग ॲथलेटिक्समध्ये तो चमक दाखवू शकला नाही.




# मानसिकता बदलून भारताकडून शिका!

## पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूचा ‘पीसीबी’ला सल्ला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाची आशिया चषक स्पर्धा युएईमध्ये येत्या २७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. दरम्यान, पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू दानिश कनेरियाने आपल्याच देशाच्या क्रिकेट बोर्डाला भारताकडून काहीतरी शिकण्याचा सल्ला दिला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) फक्त वर्तमानावर लक्ष देत आहे. दुसरीकडे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) युवा खेळाडूंना संधी देत भारताचा भविष्यातील संघ तयार करीत आहे. पाकिस्तानने मानसिकता बदलूनत्यांच्याकडून शिकावे, असे कनेरियाने म्हटले आहे.



आशिया कपमध्ये २८ ऑगस्टला भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी एकमेकांशी भिडणार आहेत. या सामन्यापूर्वी दानिश कनेरियाने आपल्या यूट्यूब चॅनलवरून एक वक्तव्य केले. तो म्हणाला, पाकिस्तानने गेल्या वर्षी झालेल्या टी-२० वर्ल्डकपनंतर फार कमी टी-२० सामने खेळले आहेत. त्यांनी तास सामने खेळले असून त्यातील सहा सामने जिंकले आहेत, तर ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक मोठा टी-२० सामना खेळला तो हरला.

पाकिस्तानच्या माजी फिरकीपटूने सांगितले की, पाकिस्तानच्या तुलनेत भारताने २४ टी-२० सामने खेळले आहेत. त्यातील त्यांनी २० सामन्यात विजय मिळवला आहे. (प्रत्यक्षात १९ सामने जिंकले आहेत.) भारताची सरासरी खूप चांगली आहे. त्यांनी जास्त करून आपली बी आणि सी टीम खेळवली. असे वाटतेय की रोहित शर्मा भारताची बेंच स्ट्रेंथ वाढवत आहे.

दरम्यान, कनेरियाने पाकिस्तानचा कच्चा दुवा दाखवून दिला आहे. त्यांच्या मते पीसीबी नेदरलँडसारख्या कमकुवत संघाविरुद्धची मालिका टाळू शकली असती. ’भारत भविष्याच्या दृष्टीने तयारी करीत आहे. दुर्दैवाने पाकिस्तान असे काही करीत नाहीये. बेंच स्ट्रेंथ तयार करण्याबाबत कोणत्याही हालचाली दिसत नाहीयेत. आपल्याला ही मानसिकता बदलून धाडस करण्याची गरज आहे. नेदरलँड दौऱ्यावर पाकिस्तानने आपला युवा संघ पाठवावा.

पाकिस्तान संघ १६ ते २१ ऑगस्टदरम्यान नेदरलँडविरुद्ध रॉटरडॅममध्ये तीन सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे. या दौऱ्यासाठी पाकिस्तानने आपल्या अनुभवी खेळाडूंचा संघ जाहीर केला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com